वर्ष- १० अंक- २३ मुंबई, मंगळवार, २३ एप्रिल ते २९ एप्रिल २०२४ पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024
पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA
संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 लग्न जुळविण्याच्या साईटवरून तरुणीची फसवणूक करणारा अटकेत

3 दाल लेक नाशाच्या मार्गावर?
हिवाळ्यात त्वचेची काळजी घेण्यासाठी कोरफडीचा फेसपॅक लावा 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

वेश्याव्यवसायात ढकलल्याच्या रागातून ४ महिन्यांच्या मुलीचे अपहरण

अल्पवयीन मुलीची सुधारगृहात रवानगी, दोघांना पोलिसांकडून अटक

डोंबिवली : डोंबिवली येथील पलावामधून एका चार महिन्यांच्या चिमुकलीचे अपहरण झाले होते. या प्रकरणाचा पोलीस तपास करत असताना, घरात काम करणाऱ्या एका अल्पवयीन मुलीला वेश्याव्यवसायात ढकलल्याने तिनेच मालकाच्या चिमुकलीचे अपहरण केल्याचे समोर आले. डोंबिवलीतील मानपाडा पोलिसांनी आरोपी अल्पवयीन मुलीला सुधारगृहात पाठवले, तर वेश्याव्यवसायात ढकलणाऱ्या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे.

डोंबिवली पूर्व येथील पलावा परिसरात राहणारा सतीश रजत याची ४ महिन्यांची मुलगी अचानक घरामधून गायब झाली. या प्रकरणी मुलीचे वडील सतीश रजत यांनी डोंबिवलीतील मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. कल्याणचे डीसीपी सचिन गुंजाळ, एसीपी सुनील कुऱ्हाडे, यांच्या मार्गदर्शनाखाली मानपाडा पोलीस ठाण्याचे वपोनि. विजय कादबाने यांच्या नेतृत्वाखाली पोलीस तपास पथके तयार करून मुलीचा शोध सुरू झाला. पोलिसांना माहिती मिळाली की, सतीशच्या घरात काम करणारी मोलकरणीनेच या मुलीचे अपहरण केले आहे. मानपाडा पोलिसांनी या मोलकरणीला शोधून काढले; परंतु ती अल्पवयीन असल्याने तिला ताब्यात

घेत चार महिन्यांच्या मुलीला तिच्या आईच्या ताब्यात दिले. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला, तेव्हा पोलिसांनी त्या अल्पवयीन मुलीला विचारले की, तिने चार महिन्यांच्या मुलीचे अपहरण का केले? तिने जे सांगितले ते ऐकून पोलीसदेखील हैराण झाले. अल्पवयीन मुलगी बांगलादेशी आहे. चार महिन्यांच्या मुलीचे वडील सतीश रजक यांनी दोन महिन्यांपूर्वी अल्पवयीन मुलगी, तिच्या आईला आणि मावशीला नोकरीला लावतो सांगून बांगलादेशातून डोंबिवलीत आणले होते. मात्र, सतीश याने त्या अल्पवयीन मुलीला नोकरीला न लावता देह व्यापार करायला भाग पाडले. दोन महिन्यांपासून ही अल्पवयीन मुलगी देहविक्रय करत होती. एवढेच नाही तर सतीश तिच्याकडून घरकामदेखील करून घेत होता. त्या मुलीला तिच्या आई आणि मावशी यांना भेटूदेखील देत नव्हता. याचा राग काढण्यासाठी पीडित अल्पवयीन मुलीने सतीशच्या चार महिन्यांच्या मुलीचे अपहरण केले होते. या पीडित अल्पवयीन मुलीला बंगाली भाषा सोडून कोणती भाषा येत नाही. या प्रकरणात मानपाडा पोलिसांनी सतीश रजत आणि त्याचा चुलत भाऊ सचिन रजत यांना दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. आरोपी अल्पवयीन मुलीला उल्हासनगर येथील बालसुधारगृहात पाठवण्यात आल्याची माहिती मानपाडा पोलीस ठाण्याचे पोनि. राम चोपडे यांनी दिली.

पत्नीला पगारवाढ न दिल्याने पतीचा मुख्याध्यापकावर हल्ला

आरोपी पतीला अटक

डोंबिवली : नोकरी करणाऱ्या सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात पगारवाढ खूप महत्त्वाची गोष्ट असते. साधारणपणे मार्च ते मे महिन्यादरम्यान प्रत्येक कर्मचाऱ्याला पगारवाढीची अपेक्षा असते. कधी कधी अनेकांना अपेक्षेपेक्षा जास्त तर काहींना नाममात्र पगारवाढ मिळते. इन्क्रिमेंट हा विषय घरादारापासून ते मित्र परिवारापर्यंत चर्चेत असतो; परंतु डोंबिवलीत एक वेगळाच प्रकार पाहायला मिळाला. शिक्षिका असलेल्या पत्नीचे इन्क्रिमेंट होत नसल्याच्या रागातून पतीने रागाच्या भरात मुख्याध्यापकावर धारदार शस्त्राने हल्ला केल्याची घटना घडली. यात जखमी झालेल्या मुख्याध्यापकावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून, डोंबिवली रेल्वे पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे.

मिनाज शेख ही महिला भिवंडीजवळील खारबाव भागातील एका शाळेत शिक्षिका आहे; परंतु मिनाजची शाळेच्या सर्व्हिस बुकमध्ये नोंद केली जात नसल्यामुळे तिचे इन्क्रिमेंट होत नव्हते. यावरून मिनाज शेख आणि मुख्याध्यापक भागवत गुरव यांच्यात नेहमी वाद व्हायचे. अनेकदा विनंती करूनही मिनाजच्या पदरी अपयशच पडले. सरतेशेवटी मिनाजने हा सगळा प्रकार आपला पती शकिल शेख याला सांगितला. हा प्रकार ऐकताच शकिल शेख याचा राग अनावर झाला. त्याने मुख्याध्यापक भागवत गुरव यांना दिवा-वसई रेल्वे मार्गावर असलेल्या खारबाव रेल्वे स्थानकावर गाठले. तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत गुरव यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. हल्ल्यात गुरव गंभीर जखमी झाले. यानंतर त्यांना नजीकच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करून नंतर कल्याण येथील खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. भागवत गुरव हे कल्याणला राहणारे असून ते दररोज कल्याण ते खारबाव असा रेल्वेने प्रवास करतात. त्यांच्या या प्रवासाच्या वेळेची शकील शेख याला माहिती होती. ती वेळ साधतच शकिलने रेल्वे स्टेशनवर गुरव यांच्यावर हल्ला केला. हल्ला केल्यानंतर शकिलने तिकडून पळ काढला; परंतु डोंबिवली रेल्वे पोलिसांनी आरोपी त्याला अटक केली आहे.

मुलीचा विनयभंग करणारा अटकेत

नवी मुंबई : वाशी सेक्टर १२ मध्ये राहणाऱ्या एका तरुणाने एका १३ वर्षीय मुलीचा पाठलाग करून वॉकिंग ट्रकमध्ये तिच्यासोबत अश्लील वर्तन करून तिचा विनयभंग केल्याची घटना रविवारी भरदुपारी घडली. इमामूल हक अकालू मुल्ला ऊर्फ बाबू (२२) असे या तरुणाचे नाव असून, वाशी पोलिसांनी त्याच्या विरोधात विनयभंग आणि पॉक्सो कलमाखाली गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

एटीएममध्ये नागरिकांना लुटणाऱ्या भामट्याला अटक

विविध कंपन्यांचे ९२ एटीएम कार्ड हस्तगत

कल्याण : एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना बोलण्यात गुंतवून त्यांच्याकडून पिन नंबर घेऊन एटीएम कार्डची अदलाबदली करत लुटणाऱ्या भामट्याला महात्मा फुले पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. दीपक झा असे त्याचे नाव असून, पोलिसांनी त्याच्याकडून विविध कंपन्यांचे ९२ एटीएम कार्ड हस्तगत केले आहेत. त्याच्या विरोधात कल्याण, डोंबिवली, भिवंडी, ठाणे, नाशिक येथील विविध पोलीस ठाण्यात तब्बल १६ गुन्हे दाखल आहेत.

काही दिवसांपूर्वी महात्मा फुले पोलीस ठाण्यात दोन महिलांनी त्यांच्या एटीएम कार्डचा वापर करत एका भामट्याने पैसे काढल्याची तक्रार नोंदवली होती. कल्याणमधील एका एटीएम सेंटरमधून त्यांनी पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता पैसे निघाले नाहीत. यावेळी त्यांच्या मदतीसाठी एक तरुण पुढे आला. त्यानेही प्रयत्न केला असता पैसे निघाले नाहीत. मात्र, थोड्याच वेळात त्यांच्या खात्यातून मोठी रक्कम काढण्यात आली. याबाबतची तक्रार आल्यानंतर पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी तानाजी वाघ यांनी याप्रकरणाचा तपास सुरू केला.

सीसीटीव्हीत कैद झालेल्या दोन तरुणांची पोलिसांनी ओळख पटवली. गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहितीद्वारे सापळा रचत दीपक झा याला अटक केली. त्याचा साथीदार मात्र पसार झाला असून, त्याचा शोध सुरू आहे.

स्टेशन परिसरात अनेक नागरिक एटीएम सेंटरमध्ये येतात. ज्यांना एटीएम ऑपरेट करता येत नाही. त्याची माहिती नसते अशा नागरिकांना दीपक झा व त्याचा साथीदार हेरायचा. जेव्हा ते एटीएममध्ये पैसे काढण्यास जात होते, तेव्हा त्यांना मदतीच्या नावाखाली दीपक आणि त्याचा साथीदार आत यायचे. त्यांचे पिन कोड पहायचे. तसेच बोलण्यात गुंतवून हातचलाखी करून दुसरेच एटीएम कार्ड नागरिकांच्या हाती द्यायचे. डुप्लिकेट एटीएमच्या सहाय्याने पैसे काढण्याचे नाटक करायचे. मात्र, पैसे निघत नसल्याने नागरिक घरी जायचे. त्यानंतर दीपक झा आणि त्याचा साथीदार ओरिजनल एटीएमच्या सहाय्याने पैसे काढून घ्यायचे. दीपक झा याने आणखी अनेक नागरिकांची अशाप्रकारे फसवणूक केल्याची शक्यता असल्याने पोलीस पुढील तपास करीत आहेत.

४२ लाखांचे एमडी जप्त

मुंबई : मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी कक्षाने नागपाडा आणि अंधेरी येथे कारवाई करत ४२ लाख रुपये किमतीचे २१० ग्रॅम मॅफेड्रोन (एमडी) जप्त केले आहे. या कारवाईत एका महिलेसह तीन ड्रग्ज तस्करांना अमली पदार्थ विरोधी कक्षाने बेड्या ठोकल्या आहेत. अंधेरी पूर्वेकडील भंडारवाडा येथे काही जण ड्रग्ज घेऊन येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी विभागाच्या घाटकोपर कक्षाला मिळाली होती. त्यानुसार, घाटकोपर कक्षाच्या पथकाने सापळा रचून पवई, आरे कॉलनी रोडवरील रहिवासी रेणुका मल्लेश कांबळे (२८) आणि मरोळ गावमधील बोरी कॉलनीतील रहिवासी शादाब सलीम मुल्ला ऊर्फ मस्तान ऊर्फ पप्या (२६) यांना ताब्यात घेत अटक केली.

स्विमिंग पूलमधील विद्यार्थ्यांच्या मृत्यूप्रकरणी स्विमिंग कोच व लाईफ गार्ड्स विरोधात गुन्हा दाखल

नवी मुंबई : वाशीतील फादर ॲग्नेल कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या मयुर आदिनाथ डमाळे (१७) या विद्यार्थ्याचा गत आठवड्यात फादर ॲग्नेल ज्युनियर कॉलेजमधील स्विमिंग पूलमध्ये बुडून मृत्यू झाला. त्यानंतर वाशी पोलिसांनी केलेल्या तपासात मयुरचा मृत्यू स्विमिंग पूलमधील स्विमिंग कोच, तसेच ४ लाईफ गार्ड्स यांच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे वाशी पोलिसांनी स्विमिंग कोचसह पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

वाशीतील फादर ॲग्नेल महाविद्यालयात अकरावीत शिक्षण घेणारा मयुर डमाळे हा विद्यार्थी नेरूळमध्ये राहत होता. गत आठवड्यात १३ मार्च रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास मयुर त्याच्या वर्गातील इतर

विद्यार्थ्यांसह वाशीतील फादर ॲग्नेल ज्युनियर कॉलेजमधील स्विमिंग पूलमध्ये पोहण्यासाठी गेला होता. यावेळी स्विमिंग पूलमध्ये पोहताना मयुर अचानक बुडाला. त्यावेळी मयुरला तत्काळ बाहेर काढण्यात आल्यानंतर त्याला कृत्रिम श्वास देऊन रुग्णालयात नेण्यात आले होते, मात्र त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर वाशी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून स्विमिंग पूल आवारात लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. या तपासात स्विमिंग पूलमधील स्विमिंग कोच व लाईफ गार्ड्स यांचे मयुरवर काळजीपूर्वक लक्ष ठेवणे कर्तव्य असताना त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे मयुरचा स्विमिंग पूलमध्ये पोहोताना बुडून मृत्यू झाल्याचे आढळून आले. त्यामुळे वाशी पोलिसांनी स्विमिंग कोच लक्ष्मणसिंग काळुसिंग ठाकूर व लाईफ गार्ड्स - आकाश बाळू देवाडे, सुरजकुमार अशोककुमार चौधरी, ओमगोविंद श्यामकिशोर यादव व सागर रावसाहेब शिवशरण या पाच जणांना मयुरच्या मृत्यूला जबाबदार धरून त्यांच्याविरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच पुढील कार्यवाहीला सुरुवात केली आहे.

भांडणातून दाम्पत्यावर जीवघेणा हल्ला

एकाच कुटुंबातील ७ जणांविरोधात गुन्हा दाखल, दोघे भाऊ अटकेत

नवी मुंबई : सोसायटीच्या अध्यक्षपदावरून काढल्याचा राग मनात धरून सोसायटीतील एका दाम्पत्याला बेदम मारहाण करून त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना मंगळवारी सकाळी उलवे सेक्टर-२१ मधील अरॅमस कॉम्प्लेक्समध्ये घडली. या हल्ल्यात सदर दाम्पत्य गंभीर जखमी झाले असून, त्यांना रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर एनआरआय पोलिसांनी या दाम्पत्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या खारकर कुटुंबातील एकूण ७ जणांविरोधात गुन्हा दाखल करून त्यापैकी दोघा भावांना अटक केली आहे.

या घटनेतील खारकर कुटुंबीय व जखमी सिंग दाम्पत्य हे सर्वजण उलवे सेक्टर-२१ मधील अरॅमस

कॉम्प्लेक्समध्ये राहण्यास आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या सोसायटीच्या अध्यक्षपदावर शरद खारकर हे होते. मात्र, सोसायटीतील इतर सदस्यांनी केलेल्या तक्रारीनंतर उपनिबंधक कार्यालयाने शरद खारकर यांना अध्यक्षपदावरून हटवून त्याजागी प्रशासकाची नेमणूक केली होती. या गोष्टीचा शरद खारकर व त्याच्या कुटुंबीयांच्या मनामध्ये रोष निर्माण झाला होता. त्यांच्याच सोसायटीत राहणारे अविनाश सिंग यांच्यामुळेच शरद खारकर यांना अध्यक्षपदावरून हटवून त्या ठिकाणी प्रशासकाची नेमणूक करण्यात आल्याचा संशय खारकर कुटुंबीयांना होता.

दरम्यान, मंगळवारी सकाळी या कॉम्प्लेक्समधील डी विंगची लिफ्ट बंद पडल्यानंतर त्यालासुद्धा अविनाश सिंग हेच जबाबदार असल्याचा आळ घेत खारकर कुटुंबीयांनी अविनाश सिंग व त्याची पत्नी नेहा या दोघांना शिवीगाळ करून बेदम मारहाण केली. या वेळी विजय खारकर याने अविनाश सिंग यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. तसेच त्यांचा डावा हात फ्रॅक्चर झाला. या वेळी शरद खारकर याच्या मुलाने नेहा सिंग हिला मारहाण केल्याने नेहा खिडकीवर आपटल्याने सदर खिडकीची काच फुटून सदरच्या काचा तिच्या हातामध्ये घुसून तीदेखील गंभीर जखमी झाली.

त्यानंतर सोसायटीतील इतर सदस्यांनी या दोघा जखमींना तत्काळ रुग्णालयात दाखल केले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर एनआरआय पोलिसांनी रुग्णालयात जाऊन जखमी नेहा व तिचा पती अविनाश सिंग या दोघांचे जबाब नोंदवून घेतले. त्यानंतर त्यांना मारहाण करणारे शरद खारकर, विजय खारकर, विजय खारकरची पत्नी, त्याची आई, शरद खारकरचा मुलगा, शरदच्या बहिणीचा मुलगा, शरद याची बहीण या सात जणांविरोधात ठार मारण्याचा प्रयत्न करणे, दंगल माजवणे अशा विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून शरद खारकर व विजय खारकर या दोघा भावांना अटक केली आहे.

माजी सैनिकानेच केली माजी सैनिकांची फसवणूक

आरबीआयमध्ये नोकरीच्या बहाण्याने माजी सैनिकांकडून उकळले सव्वादोन कोटी

नवी मुंबई : रिझर्व्ह बँकेत सिक्युरीटी गार्ड पदाची नोकरी लावून देण्याच्या बहाण्याने एका माजी सैनिकाने महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांतील २७ माजी सैनिकांना तब्बल सव्वादोन कोटी रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सदानंद भोसले असे या माजी सैनिकाचे नाव असून, नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने त्याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात फसवणूक तसेच अपहाराचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणातील आरोपी सदानंद भोसले हा माजी सैनिक असून, तो खारघर येथे राहण्यास होता. तसेच तो सीबीडी बेलापूर येथील रिझर्व्ह बँकेत सुरक्षारक्षक म्हणून कामाला होता. २०२० मध्ये ऐरोली येथे राहणारा एक माजी सैनिक दोन हजार रुपयांच्या फाटक्या नोटा बदलण्यासाठी सीबीडी बेलापूर येथील आरबीआय बँकेत गेला असताना त्याची ओळख आरोपी सदानंद भोसले याच्यासोबत झाली होती. त्या वेळी या माजी सैनिकाने २०१८ मध्ये आरबीआय बँकेची सिक्युरीटी गार्डसाठी परीक्षा दिल्याचे सदानंद भोसले याला सांगितले असता, सदानंद भोसले याने तोदेखील माजी सैनिक असल्याचे व त्याने आर्मीमधून निवृत्त झालेल्या अनेक

माजी सैनिकांना आरबीआय बँकेत नोकरी लावून दिल्याचे सांगितले होते.

तसेच त्यालादेखील आरबीआयमध्ये नोकरीला लावण्याचे आश्वासन देऊन त्यासाठी ४ लाख रुपये द्यावे लागतील, असे सांगितले. त्यानंतर सदानंद भोसले याने वेगवेगळी कारणे सांगून या माजी सैनिकांकडून ६ लाख रुपये उकळले. मात्र त्यानंतर सदानंद भोसले याने नोकरीसंदर्भात काहीच केले नाही. त्यामुळे ऑक्टोबर २०२२ मध्ये हा माजी सैनिक सदानंद भोसले याला भेटण्यासाठी बेलापूर येथील आरबीआयमध्ये गेला होता. त्या वेळी सदानंद भोसले याने एसबीआयमध्ये नोकरीला लावण्याच्या बहाण्याने सदानंद भोसले याने अनेक लोकांची फसवणूक केल्याचे त्याला तेथील सुरक्षा रक्षकांकडून समजले.

त्यांनतर या माजी सैनिकाने सदानंद भोसले याची माहिती काढली असता, त्याने महाराष्ट्रात मुंबई, पुणे, सातारा, नाशिक, नागपूर व इतर जिल्ह्यांतील एकूण २७ माजी सैनिकांना अशाच पद्धतीने आरबीआयमध्ये सिक्युरीटी गार्ड पदाची नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून तब्बल सव्वादोन कोटी रुपये उकळल्याची माहिती मिळाली. त्यानंतर या माजी सैनिकाने सदानंद भोसले याच्याकडे आपले पैसे मागण्यास सुरुवात केल्यानंतर त्याने टाळाटाळ केली, मात्र नंतर सदानंद भोसले याने न वटणारा ६ लाख रुपयांचा चेक देऊन पलायन केले. अखेर या माजी सैनिकाने नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेमध्ये धाव घेऊन सदानंद भोसले याच्या विरोधात तक्रार दाखल केली.

सायबर फसवणुकीतील ३५ लाख वाचवण्यात पोलिसांना यश

मुंबई : पोलीस आणि आयकर विभागाचे अधिकारी असल्याचे भासवून कारवाईची भीती घालत दक्षिण मुंबईतील व्यावसायिकाकडून उकळलेले ३५ लाख १२ हजार ८२९ रुपये वाचवण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी १९३० या सायबर हेल्पलाइनच्या माध्यमातून ही कामगिरी बजावली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ एप्रिलला ही घटना घडली होती. यातील सायबर ठगांनी दक्षिण मुंबईमध्ये राहणाऱ्या व्यावसायिकाला कुरियर कंपनीच्या नावाने जाळ्यात ओढले. त्यानंतर खात्यात गैरव्यवहार झाल्याचा बनाव करत पोलीस आणि आयकर अधिकारी असल्याचे भासवून कारवाईची भीती घालत त्याच्याकडून ३५ लाख १२ हजार ८२० रुपये उकळले होते. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तक्रारदार व्यावसायिकाने तत्काळ १९३० सायबर हेल्पलाइनवर संपर्क साधून माहिती दिली. गुन्हे शाखेचे उपायुक्त दत्ता नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्ताराम चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक मंगेश भोर, पोलीस शिपाई किरण पाटील यांनी तत्काळ एनसीआरपी पोर्टलवर तक्रार दाखल करून संबंधित बँकेच्या नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधला. पोलिसांनी जलदगतीने पावले उचलून फसवणुकीतील पूर्ण रक्कम संबंधित बँक खात्यावर गोठवली.

भाई... अच्छा काम है, अच्छा मिलेगा

विदेशातून गँगस्टर अनमोल बिश्नोई होता आरोपींच्या थेट संपर्कात

मुंबई : 'भाई... अच्छा काम है, अच्छा मिलेगा...' असे कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा गँगस्टर भाऊ अनमोल बिश्नोई याने शार्पशूटर सागर पाल आणि विकी गुप्ता यांना सांगत मुंबईत धाडले. विदेशातून इंटरनेट कॉलिंगच्या माध्यमातून तो थेट या दोघांच्या संपर्कात होता. सलमान खानच्या वांद्रेतील गॅलेक्सी अपार्टमेंट्समधील घर आणि पनवेलमधील अर्पिता फार्म हाऊसची रेकी करण्यापासून ते पाल आणि गुप्ता यांना भाड्याने घर घेणे, दुचाकी विकत घेणे यासाठी पैसे पोच करणे, गोळीबारासाठी पिस्तूल पोच करणे आणि गोळीबारानंतर मुंबईतून पसार होत गुजरातमधील भुजमध्ये मंदिरात लपून राहण्यापर्यंत संपूर्ण ऑपरेशन अनमोल बिश्नोई याने स्वतः हँडल केल्याची धक्कादायक माहिती गुन्हे शाखेच्या तपासात समोर आली आहे.

नदीत फेकले पिस्तूल

सलमान खानच्या घरावर गोळीबार केल्यानंतर दोन्ही आरोपींनी गुजरात गाठले. वाटेत लागलेल्या नदीत त्यांनी पिस्तूल फेकून दिल्याची माहिती पोलिसांना दिली आहे. याबाबत आरोपीकडे चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

वांद्रे बँड स्टँडमार्गे दुचाकीवरून आल्यानंतर पाल आणि गुप्ता यांनी गॅलेक्सी अपार्टमेंट्सच्या दिशेने पाच राऊंड फायर करून पळ काढला. रविवारी पहाटे चार वाजून ५० मिनिटांनी ही घटना घडली. पाल आणि गुप्ता यांनी येथील चर्चजवळ दुचाकी सोडून रिक्षाने पश्चिम रेल्वेचे वांद्रे रेल्वे स्थानक गाठले. वांद्रे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकवरून या दोघांनी सकाळी ५ वाजून ८ मिनिटांची बोरिवलीच्या दिशेने जाणारी लोकल पकडली. मात्र, हे दोघेजण मध्येच सांताक्रुझ रेल्वे स्थानकात उतरले. सांताक्रुझ रेल्वे स्थानकातून सव्वापाचच्या सुमारास बाहेर पडून हे दोघे वाकोल्याच्या दिशेने चालत गेले. येथून त्यांनी एक टॅक्सी पकडली. टॅक्सीने मुंबईच्या वेशीपर्यंत जात तेथून बसने गुजरातच्या सुरत, अहमदाबाद मार्गे भुजमध्ये पोहचले. येथील एका मंदिरामध्ये ते लपून बसले होते. पाल आणि गुप्ता यांचा माग काढत गुन्हे शाखेने भुज पोलिसांच्या मदतीने दोघांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

गुन्ह्यातील तांत्रिक पुराव्यांवरून गुन्हे शाखेने आरोपी पाल आणि गुप्ता यांचा माग सुरू ठेवला. दोघेही भुजमध्ये असल्याचे समोर येताच गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तीन पोलीस निरीक्षकांची निवड करून त्यांना गुजरातला धाडले. आरोपी वास्तव्यास असलेला परिसर माहितीचा नसल्याने आणि आरोपीकडे पिस्तुले असण्याच्या शक्यतेतून गुन्हे शाखेने भुज पोलिसांची मदत घेतली. हे सर्व ऑपरेशन गुन्हे शाखेचे वरिष्ठ अधिकारी मुंबई पोलीस आयुक्तालयात बसून हँडल करत होते. आरोपी हे एका मंदिरात असल्याचे समोर आले. या मंदिरात नुकताच होम पार पडला होता. भक्तगण दर्शनासाठी येत होते. पोलिसांनी भक्त बनून मंदिरात प्रवेश केला. येथे बॅग उषाशी घेऊन पाल आणि गुप्ता झोपले होते. हीच संधी साधून गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी दोघांनाही ताब्यात घेतले.

गँगस्टर अनमोल बिश्नोई याने नेहमीप्रमाणे या गुन्ह्यासाठी नवीन चेहरे निवडले होते. तो थेट इंटरनेट व्हीओआयपी कॉल्सच्या माध्यमातून शूटर पालच्या संपर्कात होता. त्याने पालला चांगल्या दर्जाचे पिस्तूल दिले होते. यातून पालने पाच गोळ्या झाडल्या. यातील एक गोळी थेट सलमान खानच्या घरात शिरून भिंतीवर बसली. त्यामुळे, शूटर पालला पिस्तूल चालवण्याचे प्रशिक्षणसुद्धा देण्यात आल्याचे गुन्हे शाखेला संशय आहे. गँगस्टर अनमोल बिश्नोई यानेच हल्ल्याचा कट रचून तो पूर्णत्वास नेल्याने गुन्हे शाखेने दाखल गुन्ह्यात भादंवि कलम १२० (ब) ची वाढ केली आहे.

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेचे सह आयुक्त लखमी गौतम, अप्पर पोलीस आयुक्त शशि कुमार मीना, पोलीस उपायुक्त दत्ता नलावडे, विशाल ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या कक्ष नऊचे वपोनि दया नायक, कक्ष ११ चे पोलीस निरीक्षक भरत घोणे, खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक अरुण थोरात यांच्या पथकाने ही कामगिरी बजावली आहे.

बॉलीवूड अभिनेता सलमान खान याच्या वांद्रेतील गॅलेक्सी अपार्टमेंट्समध्ये असलेल्या घरावर १४ एप्रिलच्या पहाटे करण्यात आलेल्या गोळीबार प्रकरणात मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने बिश्नोई टोळीच्या शार्पशूटर विकी गुप्ता आणि सागर पाल यांना गुजरातच्या भुजमधील एका गावातून अटक केली आहे. न्यायालयाने दोन्ही आरोपींना २५ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून गुन्हे शाखेचे अधिकारी त्यांच्याकडे कसून चौकशी करत आहेत.

बिहार राज्यातील चंपारणचा रहिवासी असलेला पाल हा दोन वर्षांपूर्वी हरयाणामध्ये मोलमजुरीच्या कामासाठी गेला होता. येथे तो बिश्नोई टोळीच्या संपर्कात आला. काही महिन्यांनी त्याने आपल्या गावातील ओळखीच्या गुप्ताला बिश्नोई टोळीशी जोडले. दोघेही नवखे असल्याने गँगस्टर अनमोल बिश्नोई याने त्यांना सलमान खानच्या घरावर हल्ला करण्यासाठी निवडले. दोघांनाही २८ फेब्रुवारीला मुंबईत पाठवण्यात आले. २८ फेब्रुवारी आणि २९ फेब्रुवारीला या दोघांनी वांद्र्यात राहून सलमान खानच्या गॅलेक्सी अपार्टमेंट्समधील घराची रेकी केली. १ मार्चच्या दुपारी दोघेही पनवेलला पोहचले. बिश्नोई टोळीने या दोघांच्या वास्तव्यासाठी सलमान खानच्या पनवेलमधील अर्पिता फार्म हाऊसपासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावर असलेल्या हरिग्राम गावातील राधाकृष्ण अपार्टमेंटमधील एक फ्लॅट १० हजार रुपये ॲडव्हान्स देऊन महिना साडेतीन हजार रुपयांवर ११ महिन्यांच्या भाडेकरारावर घेऊन दिला. फ्लॅटमध्ये राहून दोघेही सलमान खानच्या गॅलेक्सी अपार्टमेंट्समधील घर आणि पनवेलमधील अर्पिता फार्म हाऊसची रेकी करत होते. रेकी करण्यासाठी दोघांना सूचना देण्यापासून दोघांच्या खाण्या-पिण्यापासून सर्व खर्च अनमोल बिश्नोई करत होता. त्याने एक चांगल्या दर्जाचे पिस्तूल मुंबईत पाल याच्याकडे पोच केले. पुढे, पाल याला सेकंड हॅन्ड बाईक खरेदी करण्यासाठी २४ हजार रुपये रोख पोच केले. या पैशांतून पालने २ एप्रिलला दुचाकी खरेदी केली.

सलमान खानवर हल्ला करण्याची तयारी करत असतानाच पाल आणि गुप्ता हे २० मार्चला होळी साजरी करण्यासाठी चंपारणमधील गावी गेले. होळी आणि रंगपंचमी साजरी करून २८ मार्चला दोघेही पुन्हा मुंबईत परतले. पुन्हा त्यांनी सलमानचे घर आणि फार्म हाऊसची रेकी केली. अखेर सलमान खान हा घरात असल्याची माहिती घेऊन दोघांनी १४ एप्रिलच्या पहाटे सलमान खानच्या घरावर पाच गोळ्या झाडून पळ काढल्याचे गुन्हे शाखेच्या तपासात समोर आले आहे.

लग्न जुळविण्याच्या साईटवरून तरुणीची फसवणूक करणारा अटकेत

बँकेचे अधिकारी बनून पोलिसांनी आरोपीला ठोकल्या बेड्या

नवी मुंबई : विवाहित असताना देखील लग्न जुळविण्याऱ्या साईटवरून विवाहेच्छुक तरुणींना गाठून त्यांना लग्नाचे आमिष दाखवून वेगवेगळ्या बहाण्याने त्यांच्याकडून लाखो रुपये उकळून त्यांची फसवणूक करणाऱ्या नबील मुनीर खान (३०) या भामट्याला खारघर पोलिसांनी श्रीवर्धन येथून अटक केली आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी बँकेचे अधिकारी बनून त्याच्या घरापर्यंत जाऊन त्याला अटक केली आहे. या भामट्याने अशाच पद्धतीने अनेक तरुणींची फसवणूक केली असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यानुसार पोलिसांकडून त्याची अधिक चौकशी करण्यात येत आहे.

या प्रकरणातील आरोपी नबील मुनीर खान हा विवाहित असताना देखील त्याने काही महिन्यांपूर्वी मेट्रीमोनियल साईटवर लग्नासाठी आपली माहिती टाकली होती. त्यानंतर त्याने त्याच मेट्रीमोनियल साईटवर स्वतःसाठी वराच्या शोधात असलेल्या खारघर येथील २८ वर्षीय तरुणीसोबत ओळख वाढवली होती. त्यानंतर त्याने सदर तरुणीला त्याचा दक्षिण आफ्रिका देशात मायनिंगचा तर मुंबईतील डोंगरी भागात टुर्स अँड ट्रव्हल्सचा व्यवसाय असल्याचे सांगून तसेच तिच्यासोबत विवाह करण्याचे आमिष दाखवून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर भामटा नबील याने वेगवेगळी कारणे सांगून तरुणीकडून तब्बल ६ लाख ३१ हजारांची रक्कम उकळली होती. मात्र त्यानंतर देखील नबीलकडून पैशांची मागणी सुरूच राहिल्याने तरुणीला त्याच्यावर संशय आला. त्यामुळे या तरुणीने त्याच्याकडे आपली रक्कम परत मागण्यास सुरुवात केली असता, त्याने टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे या तरुणीच्या लक्षात आल्यानंतर तिने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार खारघर पोलिसांनी भामट्या नबील विरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला होता.

त्यासाठी पोलिसांनी तांत्रिक तपासाद्वारे या आरोपीचा माग काढण्यास सुरुवात केली होती. यादरम्यान, आरोपी नबील हा श्रीवर्धन येथे आपल्या गावी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) अतुल आहेर, पोलीस कॉन्स्टेबल किरण पाटील, पोलीस नाईक मच्छिंद्र खेडकर, पोलीस शिपाई नितीन जावरे यांच्या पथकाने श्रीवर्धन गाठून आरोपीला बेड्या ठोकल्या. न्यायालयाने या आरोपीची ५ दिवसांच्या पोलीस कोठडीत रवानगी केली आहे. या प्रकरणातील आरोपी नबील खान याला बँकेत खाते उघडायचे होते, त्यामुळे तो श्रीवर्धन येथील एका बँकेच्या अधिकाऱ्यांशी संपर्कात होता. पोलिसांना याबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी बँकेच्या अधिकाऱ्याला विश्वासात घेऊन स्वतः बँक अधिकारी-कर्मचारी बनले. त्यानंतर पोलिसांनी बँकेचे खाते उघडण्याच्या बहाण्याने नबील खान याचे घर गाठून त्याला ताब्यात घेतले.

मुलुंडमधील मनपाच्या शाळेला नशेबाजांचा विळखा

मुंबई : मुलुंड पश्चिम केशव पाडा या ठिकाणी असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या शाळेभोवती नशेबाजांनी आपला अड्डा तयार केला आहे. या नशेबाजांचा व्हिडीओ व्हायरल होताच पोलिसांनी तत्काळ या व्हिडीओची दखल घेऊन परिसरात गस्त वाढवली आहे. मुलुंड पश्चिमेतील केशव पाडा या ठिकाणी असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या शाळेभोवती मोठ्या प्रमाणात नशेबाजांनी आपले अड्डे तयार केले आहेत. शाळेत येणाऱ्या विद्यार्थी आणि शिक्षकांना या नशेबाजांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शाळेत येणाऱ्या विद्यार्थिनींची छेड काढणे यासारखे प्रकार या नशेबाजांकडून सुरू आहेत. शाळेजवळ सतत समाजकंटकांचा वावर असल्यामुळे येथील नागरिक आणि पालकांमध्ये चिंतेचे आणि भीतीचे वातावरण पसरले आहे. नशेबाजांमुळे विद्यार्थ्यांना याची लत लागू नये, म्हणून पोलिसांनी काळजी घ्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. शाळेजवळ असलेल्या समाजकंटकांना पोलिसांनी वेळीच आवर घालावा. या भागामध्ये पोलिसांनी रोज गस्त घालावी, जेणेकरून या समाजकंटकांवर जरब बसेल, असे येथील स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे.

दिघ्यात विषारी द्रव पिऊन तरुणाची आत्महत्या

पत्नीसह दुसरा पती, सासऱ्याविरोधात गुन्हा दाखल

नवी मुंबई : दिघा ईश्वर नगर भागात राहणाऱ्या एका विवाहित तरुणाने, पत्नी व तिने केलेला दुसरा पती व सासरा या तिघांकडून होत असलेल्या छळवणुकीला कंटाळून विषारी द्रव पिऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. त्याने आत्महत्येपूर्वी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीनुसार रबाळे एमआयडीसी पोलिसांनी पत्नी, तिचे वडील व तिचा दुसरा पती या तिघांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणातील मृत तरुण हा दिघा ईश्वर नगर येथे आई-वडिलांसह राहण्यास होता. मार्च २०१५ मध्ये त्याचा विवाह वाशिम येथील तरुणीसोबत झाला होता. वर्षभरातच कौटुंबिक कारणावरून वादविवाद झाल्यानंतर तरुणाची पत्नी गावी निघून गेली. त्यानंतर तिने वाशिम येथील न्यायालयात तरुणाविरोधात केस दाखल केली. त्यामुळे न्यायालयाने तरुणाच्या पत्नीला दर महिन्याला ५ हजार रुपये पोटगी देण्याचे आदेश दिले होते. या कालावधीत तिने दुसऱ्यासोबत घरोबा करून संसार थाटला. ही माहिती तरुणाला मिळाली होती. मात्र, त्यानंतरही ती तरुणाकडून पोटगीची रक्कम घेत होती. तो कुठेही कामधंदा करत नसताना, त्याला न्यायालयाच्या आदेशामुळे दर महिन्याला पत्नीला ५ हजार रुपये द्यावे लागत होते. तो महिन्याला ५ हजार रुपये पोटगी देत होता, त्यामुळे या त्रासाला कंटाळून तरुणाने घरामध्ये कुणीही नसताना त्याने विषारी द्रव पिऊन आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने लिहून ठेवलेल्या चिठ्ठीमध्ये पत्नी, तिचा दुसरा पती व सासरा यांच्या छळाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचे, तसेच त्याच्या आत्महत्येला हे तिघेच जबाबदार असल्याचे देखील म्हटले होते. त्यामुळे रबाळे एमआयडीसी पोलिसांनी या तिघांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

महिलेचे दागिने लुटले

नवी मुंबई : मोटारसायकलवरून आलेल्या एका लुटारुने फेरफटका मारण्यासाठी घराबाहेर पडलेल्या एका महिलेच्या गळ्यातील तब्बल १ लाख ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने खेचून पलायन केल्याची घटना बुधवारी रात्री वाशी सेक्टर-२९ मध्ये घडली. या घटनेतील लुटारुने महिलेच्या गळ्यातील दागिने जोरात खेचल्याने महिला खाली पडून जखमी झाली आहे. वाशी पोलिसांनी या घटनेतील अज्ञात लुटारुविरोधात जबरी लूट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. या घटनेतील तक्रारदार महिला पद्मजा डी. व्ही (४५) या वाशी सेक्टर-२९ मध्ये कुटुंबासह राहण्यास आहेत. पद्मजा या दररोज सायंकाळी बिल्डिंगच्या खाली फिरण्यासाठी जात असतात. तसेच रात्री ९ वाजता परत घरी जातात. बुधवारी सायंकाळीदेखील त्या फेरफटका मारल्यानंतर आपल्या घरी परतत असताना, रात्री ९ वाजण्याच्या सुमारास शिरीन सोसायटीच्या गेटजवळ त्यांच्या मागून काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून आलेल्या एका लुटारुने पद्मजा यांना काही कळायच्या आत त्यांच्या गळ्यातील १ लाख ८० हजार रुपये किमतीची सोन्याची चेन जोरात खेचली. त्यामुळे पद्मजा जोरात खाली पडल्याने त्यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर सदर लुटारूने पलायन केल्याने पद्मजा यांनी उठून आरडाओरड केली. मात्र, तोपर्यंत सदर लुटारू मोटारसायकलवरून पसार झाल्याने पद्मजा यांनी पतीसह वाशी पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

चोरट्यांकडून ३० मोबाईल हस्तगत

मुंबई : कांदिवली पश्चिम, महावीर नगर या ठिकाणी कांदिवली पोलीस ठाण्याचे पोलीस गस्त करत असताना, संशयित दोन तरुणांना पकडले. सखोल चौकशी केल्यानंतर बंटी सुरेंद्र भोसले (२०) आणि विक्रम विजय भोसले (२०) या दोघांकडून ३० मोबाईल हस्तगत करण्यात आले. आरोपी हे सध्या पोलीस कोठडीमध्ये आहेत.

कांदिवली पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक दीपक पाटील, पोउपनि. नारायण खाडे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोह. जायभाये, पोशि. जोगलपुरे, पोशि. नवलु, पोशि. प्रवीण वैराळ, गवळी, महिला पोशि. म्हात्रे, पोशि. राणे हे महावीर नगर परिसरात गस्त घालत असताना, दोन तरुण संशयितरीत्या फिरताना आढळून आले. या दोन तरुणांना पकडून कांदिवली पोलीस ठाण्यात चौकशी केली असता, एकूण सहा गुन्हे कबूल केले. दोन्हीही चोर कमला विहार स्पोर्ट्स क्लब, महावीर नगर पथ येथे राहतात.

या दोन चोरट्यांकडून विवो, पोको, रियल्मी, जिओ, मोटोरोला, रेड मी, टेक्नो आणि ओपो अशा विविध कंपन्यांचे तब्बल ३ लाख ४२ हजार रुपये किमतीचे ३० मोबाईल हस्तगत करण्यात आल्याचे वपोनि. ज्ञानेश्वर गोणोरे यांनी सांगितले.

स्पाच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश

मुंबई : महालक्ष्मी येथे स्पाच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा गावदेवी पोलिसांनी पर्दाफाश करत दोन मुलींची सुटका केली आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून 'बेरी स्पा'चा मालक विजयप्रताप रामस्वरूप वर्मा (३५) याला अटक केली आहे.

येथील भुलाभाई देसाई रोडवरील 'बेरी स्पा'मध्ये चालक डेव्हिड आणि तुलसी सिंग ऊर्फ सिमरन

तसेच मॅनेजर दुर्गेश गुप्ता हे मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवत असल्याची माहिती गावदेवी पोलिसांना मिळाली. त्यानुसार, पोलिसांनी रविवारी सायंकाळी या स्पावर छापेमारीकरून दोन मुलींची सुटका केली. दोन्ही मुलींना महिला सुधारगृहात पाठवण्यात आले आहे. या कारवाईत स्पा मालक वर्मा याला अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सायबर फसवणुकीतील सराईत आरोपीला बेड्या

मुंबई : बनावट वेबसाईट तयार करून त्यावरून गाडी भाडेतत्त्वावर देण्याचे आमिष दाखवत वरळीतील तरुणाची १ लाख ७९ हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या सायबर ठगांच्या टोळीतील एका सदस्याला ना. म. जोशी मार्ग पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अब्दुल सदावत खान असे अटक आरोपीचे नाव असून पोलिसांनी त्याच्याजवळून ६ मोबाईल फोनसह एकूण ४ लाख ७९ हजार रुपयांची मालमत्ता हस्तगत केली आहे. या गुन्ह्यात एकूण ७ आरोपी निष्पन्न झाले असून अधिक तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. वरळीतील रहिवासी असलेला संकेत बडे हा तरुण लोअर परळमधील एका कंपनीत नोकरी करतो. अहमदाबाद येथे जाण्यासाठी गाडी भाड्याने हवी असल्याने त्याने गुगलवर शोध घेतला. त्याला महादेव कार रेंटल डॉट कॉम नावाची वेबसाईट दिसली. त्याने या वेबसाईटवर आवश्यक माहितीसह पेमेंट ऑप्शनवर क्रेडिट कार्डची माहिती भरली. मात्र पेमेंटसाठी तांत्रिक प्रॉब्लेम दाखवला गेला. काही वेळात बडे याला एका नंबरवरून लिंक पाठवत यातून ॲप डाऊनलोड करण्यास भाग पाडण्यात आले. त्यानंतरही पेमेंट होत नसल्याचा त्याला मेसेज आला; पण त्याच्या क्रेडिट कार्डवरून व्यवहार झाले होते. त्यात १ लाख ७९ हजार ९०० रुपयांचे हस्तांतरण झाले होते. त्यानंतर आपली सायबर फसवणूक झाल्याची खात्री पटल्याने बडे याने बँकेबरोबरच ना. म. जोशी मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दिली. याप्रकरणी ना. म. जोशी मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. गुन्ह्याच्या तांत्रिक तपासात आरोपी खान याचा सहभाग समोर आला. पोलिसांनी १६ एप्रिलला त्याला सांताक्रूझमधून ताब्यात घेत अटक केली.

लग्नास नकार दिल्याने प्रेयसीचे व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी

नवी मुंबई : प्रेयसीने लग्न करण्यास नकार दिल्याने संतप्त झालेल्या एका प्रियकराने प्रेयसीसोबतचे अश्लील व्हिडीओ तिच्या भावी पतीला पाठवून तिचे लग्न मोडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्यानंतर देखील या प्रेयसीने लग्न करण्यास नकार दिल्याने आरोपी प्रियकराने प्रेयसीचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन तिला त्रास देण्यास सुरुवात केली. खारघर पोलिसांनी या प्रियकराविरोधात बलात्कारासह, फसवणूक तसेच आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणातील २८ वर्षीय प्रियकर वाशी सेक्टर-९ मध्ये राहण्यास असून, त्याची २७ वर्षीय प्रेयसी खारघरमध्ये राहण्यास आहे. वर्षभरापूर्वी या दोघांची ओळख झाली होती. त्यावेळी या प्रियकराने तो मोठ्या पदावर नोकरीला असल्याचे सांगून प्रेयसीचा विश्वास संपादन केला होता. त्यानंतर या दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाल्यानंतर प्रियकराने आपल्या प्रेयसीला लग्नाचे आमिष दाखवून तिला सानपाडा येथील स्काय स्वीट हॉटेलमध्ये नेऊन तिच्यासोबत जबरदस्तीने शरीर संबंध ठेवले होते.

त्यावेळी या प्रियकराने प्रेयसीसोबत शरीर संबंध करतानाचा व्हिडीओ बनवला होता. त्यानंतर आपला प्रियकर हा कुठल्याही मोठ्या पदावर नोकरीला नसल्याचे व त्याने आपली फसवणूक केल्याचे लक्षात आल्यानंतर या प्रेयसीने त्याच्यासोबतचे प्रेमसंबंध तोडून टाकले होते. त्यानंतर या प्रेयसीने दुसऱ्या तरुणासोबत लग्न जुळवले होते. ही बाब प्रियकराला समजल्यानंतर त्याने प्रेयसीचे ज्या तरुणासोबत लग्न जुळले होते, त्याला प्रेयसीसोबतचा अश्लील व्हिडीओ पाठवून देत त्यांचे लग्न मोडून टाकले.

त्यानंतर या प्रियकराने प्रेयसीवर लग्न करण्यासाठी दबाव आणण्यास सुरुवात केली. तसेच त्याच्यासोबत लग्न न केल्यास तिचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या प्रेयसीने खारघर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. या प्रकरणातील आरोपीला अद्याप अटक करण्यात आली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.

बेकायदेशीर हुक्का पार्लरवर पोलिसांचा छापा

नवी मुंबई : एपीएमसीतील हॉटेल टॉय व्हिलामध्ये छुप्या पद्धतीने बेकायदेशीरीत्या सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर एपीएमसी पोलीस आणि अमली पदार्थ विरोधी पथकाने बुधवारी मध्यरात्री छापा मारला. या कारवाईत हुक्का पार्लर चालक व वेटर अशा तीन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईत पोलिसांनी हुक्का ओढण्यासाठी लागणारे साहित्य व वेगवेगळ्या प्रकारचे हुक्का फ्लेवरदेखील जप्त केले आहे. गत मार्च महिन्यामध्ये देखील या हॉटेलमध्ये सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर पोलिसांनी कारवाई केली होती.

एपीएमसीतील सत्रा प्लाझामधील पहिल्या मजल्यावरील शॉप नंबर-११७ मधील हॉटेल टॉय व्हिलामध्ये छुप्या पद्धतीने हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती, त्यानुसार अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निरज चौधरी व त्यांच्या पथकाने एपीएमसी पोलिसांच्या मदतीने बुधवारी मध्यरात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास हॉटेल टॉय व्हिलावर छापा मारला. या वेळी आतमध्ये काही गिऱ्हाईक हुक्का ओढत धूम्रपान करत असल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी या हॉटेलमधील मॅनेजर आणि दोन वेटर या तिघांना ताब्यात घेतले.

या हॉटेलमधील मॅनेजर आणि वेटरने निकोटीनबाबत जनजागृतीपर फलक न लावता, तसेच नो स्मोकिंग झोनबाबत काही एक उपाययोजना न करता महाराष्ट्रात प्रतिबंधीत असलेल्या हुक्क्याचे फ्लेवर व हुक्का पिण्यासाठी लागणारे साहित्य ठेवून ग्राहकांच्या जीवितास व सुरक्षेला धोका उत्पन्न होईल, असे कृत्य केल्याने पोलिसांनी या हॉटेलचा मॅनेजर आणि वेटर या तिघांविरोधात कोपटा कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत हुक्का ओढण्यासाठी लागणारे साहित्य व वेगवेगळ्या प्रकारेचे हुक्का फ्लेवरदेखील पोलिसांनी जप्त केले आहे.

एपीएमसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सत्रा फ्लाझा या व्यावसायिक इमारतीमध्ये बार रेस्टॉरंट, मसाज पार्लर, हुक्का पार्लर, सलूनच्या नावाखाली विविध प्रकारचे अनैतिक धंदे व गैरप्रकार राजरोसपणे सुरू असल्याचे पोलिसांनी यापूर्वी केलेल्या विविध प्रकाराच्या कारवाईवरून दिसून आले आहे.

संपादकीय

समस्येचा चक्रव्यूह!

संपादक दिपक मोरेश्वर नाईक

जन्माला आलेल्या प्रत्येक बालकाची सरकार दरबारी नोंद व्हावी आणि त्याच्या अस्तित्वाला अधिकृतता यावी, हा प्रत्येक बालकाचा हक्क असतो. जन्माचा दाखला हा त्याचा पहिला हक्क प्राप्त झाला की, बालकाची जसजशी वाढ होत जाईल तसतसा त्याच्या अन्य हक्कांच्या जाणिवा अगोदर पालकांमध्ये, नंतर समाजामध्ये आणि त्याबरोबरच सरकारी यंत्रणांमध्येही जागृत असतील, तर बालकांचे शारीरिक आणि बौद्धिक पोषण योग्य रीतीने होते. ते तसे व्हावे यासाठी शिक्षणाचा हक्क हा जन्माच्या दाखल्यानंतरचा दुसऱ्या क्रमांकाचा हक्क ठरला. पालकांस परवडेल आणि बालकांच्या बौद्धिक क्षमतेस मानवेल असे शिक्षण त्याला क्रमाक्रमाने मिळाले पाहिजे, यासाठी सरकारी यंत्रणांनी काळजी घ्यावी, यासाठी शिक्षण हक्क कायदा अस्तित्वात आला; तरी बालकांच्या जन्मासोबत त्याचे बोट धरून आलेल्या समस्यांनी कायमची माघार घेतलेली नाही. वस्तुतः या समस्यांची जाणीव संबंधितांस नाही असे मुळीच नाही. उलट, या समस्यांवर तोडगा काढण्याकरिता ज्या काही उपाययोजना केल्या जातात, त्यावर कोट्यवधी रुपये खर्च होऊन एकामागून एक अहवाल सरकारी दप्तरांच्या ढिगाऱ्यांत जमादेखील होत असतात. प्रत्येक समस्येचा अभ्यास असलेले अनेक तज्ज्ञ सरकार दरबारी असतात आणि जेव्हा अशा काही समस्या उग्र होतात, तेव्हा हे तज्ज्ञ उपायांचे अहवाल नव्याने तयार करून सरकारी यंत्रणांना सादर करतात. बालकांशी संबंधित असलेल्या समस्यांवरील संशोधने, त्यावरील उपाययोजनांच्या शिफारशींचे असंख्य अहवाल सरकारी दप्तरांच्या बासनात वर्षानुवर्षे पडलेले आढळतात, तरीही त्या समस्या कायमच्या सोडविण्यात अंतिम यशाचा टप्पा गाठणे शक्य का होत नाही, हे एक कोडे अजूनही शिक्षण व्यवस्थेभोवती घिरट्या घालत आहे. केवळ शिक्षणच नव्हे, तर बालकांच्या आरोग्यविषयक समस्यांवरील उपायांच्या असंख्य शिफारशी सोबत असूनही त्या समस्यांचा विळखा सुटलेला नाही. उलट ग्रामीण आणि दुर्गम भागांतील बालकांच्या कुपोषणासारख्या समस्येने शहरी भागांतील काही वस्त्यांमध्येही ठाण मांडलेले दिसू लागले आहे. जन्माच्या दाखल्याचा हक्क प्राप्त होऊनही सुरक्षित जगण्याकरिता आणि भविष्य घडविण्याकरिता आवश्यक असलेल्या शिक्षणाचा हक्कदेखील बालकांस प्राप्त झाला, परंतु त्यासाठी आवश्यक असलेल्या सुविधा सहजपणे उपलब्ध होण्यातील अडथळे मात्र अजूनही दूर झालेले नाहीत. तसे नसते तर विद्यार्थ्यांच्या गळतीची समस्या अजूनही शिक्षण खात्याची डोकेदुखी ठरून राहिली नसती. शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक विद्यार्थ्यास आठवीपर्यंतचे शिक्षण मोफत मिळाले पाहिजे, पण महानगरांमधील महापालिकांच्या शाळांत केवळ सातवीपर्यंतचेच वर्ग असल्याची बाब पूर्वी एकदा मुंबईसारख्या महानगरात उघडकीस आली होती. सहाजिकच पुढच्या शिक्षणाकरिता आवश्यक असलेला खर्च न पेलवल्याने शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ विद्यार्थ्यांवर येते, ही बाब सरकारी अहवालांतून निसटलेली नाही. गेल्या अनेक अहवालांत शिक्षणाचा न पेलवणारा खर्च ही बाब नोंदविली गेली असेल, तरीही यावर तोडगा निघण्याची आणि हक्काचे शिक्षण मोफत देणाऱ्या शाळांमध्ये तशी सुविधा निर्माण करण्याची गरज अजूनही पूर्ततेच्या प्रतीक्षेत असल्याचेच दिसते. विद्यार्थ्यांच्या गळतीची जी काही अनेक कारणे वेळोवेळी निदर्शनास आणून दिली गेली आहेत, त्यापैकी आणखी एक कारण अजूनही अनेक शाळांत दुर्लक्षित राहिले आहे. ते म्हणजे, शाळांमध्ये सुरक्षित व आरोग्यपूर्ण स्वच्छतागृहांचा व सोयीसुविधांचा अभाव! या प्रश्नांवर पूर्वी न्यायालयांनीही सरकारी यंत्रणांस धारेवर धरल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत आणि अजूनही सरकारी यंत्रणा या त्रुटी दूर करण्याच्या विविध उपाययोजनांची भेंडोळी वेळोवेळी फडकावतच आहेत. या समस्यांमुळे ज्या भागांत गळतीचे प्रमाण अधिक आहे, त्याची पाहणी करून त्या त्रुटी तातडीने दूर करा, असा एक आदेश उच्च न्यायालयाने सुमारे आठ वर्षांपूर्वी मुंबई महापालिकेस दिला होता. न्यायालयांचे असे निर्देश सर्वसाधारणपणे संबंधित क्षेत्रांतील अन्य शाळांनीदेखील अमलात आणावेत अशी सर्वसाधारण अपेक्षा असते. मात्र, अजूनही या त्रुटी आणि गैरसोयींना बाहेरचा रस्ता दाखविला गेलेला नाही, हे उघड होत आहे.

ते कसे, हे पाहण्यासाठी राज्य सरकारने जारी केलेल्या एका ताज्या शासन निर्णयातील तपशील पडताळून पाहावा लागेल. शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीनुसार, प्रत्येक बालकाच्या निवासापासून एक किलोमीटर अंतराच्या आत प्राथमिक शाळा आणि तीन किलोमीटर अंतराच्या परिसरात उच्च माध्यमिक शाळा किंवा वाहतुकीची सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक आहे. मात्र, अजूनही राज्यातील जिल्हा परिषदांच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सुमारे ६० हजार शाळांपैकी २८ हजार शाळांमध्ये पाचवीचा वर्ग जोडला गेलेला नाही, तर १२ हजार शाळांमध्ये आठवीचा वर्गच जोडला गेलेला नाही. राज्यात खाजगी व्यवस्थापनांच्या शाळांसह सर्व शाळांची एकूण संख्या सुमारे एक लाख १० हजार एवढी आहे. एका ताज्या सरकारी निर्णयानुसार, या शाळांतील प्रत्येक वर्गातून पुढच्या वर्गात जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत सुमारे एक लाखांची घट होत असल्याचे दिसून आल्याने, गळतीच्या समस्येने सरकारी अहवालांतील उपायांना पुन्हा आव्हान दिल्याचे स्पष्ट होत आहे. यापैकी सुमारे ४० हजार विद्यार्थी अन्य शाळांत जात असल्याचे गृहीत धरले, तरी ६० हजार विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागत असावे असा निष्कर्ष सरकारनेच काढल्याने समस्येची जाणीव सरकारला आहे, एवढीच समाधानाची बाब मानता येईल. त्यामुळे आता पुन्हा एकदा कायद्यातील तरतुदींची कठोर अंमलबजावणी करून ही समस्या दूर करण्याकरिता शाळांची दर्जावाढ करण्याची जाणीव शिक्षण खात्यास झाली आहे. कोणतीही समस्या कायमची दूर होत नाही, तर फिरून पुन्हा त्याच जागी येते, याचे हे उदाहरण म्हणावे लागेल.

दाल लेक नाशाच्या मार्गावर?

काश्मीरच्या अनेक लहान-मोठ्या तलावांपैकी सर्वात प्रसिद्ध आहे ते दाल लेक, ज्यावर काश्मीरची अर्थव्यवस्था आणि पर्यावरण कार्य अवलंबून आहे. या तलावावर व त्याच्या सौंदर्यावर सगळे पर्यटक भाळतात. परंतु, या पाण्यावरच मानववंशजन्य दबाव असल्याने या तलावाने पर्यावरणीय बिघाड झालेले दर्शविण्यास सुरुवात केली आहे. परंपरेने श्रीनगरच्या भाजी मंडईला तलावाच्या परिसरातील प्रसिद्ध तरंगत्या बागा आणि बागायती जमिनीतून पुरवठा केला जातो. शिवाय तलावाच्या मोठ्या क्षेत्रावर पुन्हा हक्क मिळवून त्याचे तरंगत्या उद्यानात रूपांतर करण्यात आले आहे.

इथे राहणारे लोक म्हणतात की, ते पूर्वी हेच पाणी पिण्यासाठीदेखील वापरत. परंतु, ते आता पिण्याच्या लायकीचे राहिलेले नाही. मोठ्या प्रमाणावर झालेले शहरीकरण, प्रचंड प्रदूषण, अनियोजित वाढ, वाढता गाळ, जमिनीचं पाण्यावरील अतिक्रमण आणि प्रकिया न करता पाण्यात जाणारं सांडपाणी या सगळ्यामुळे तळ्याचं पाणी गेल्या पाच-सहा दशकात अत्यंत खराब झालं आहे. शेती, मासेमारी व पर्यटन अशा अनेक प्रकारच्या क्रियाकलापांमुळे इथल्या लोकांना रोजगार मिळतो. परंतु, आता याच गोष्टी या सरोवरासाठी धोकादायक ठरत आहेत.

दाल सरोवर श्रीनगरमधे झबर्वान या पर्वतराजीच्या पायथ्याशी आहे. उत्तरेकडून खोल आणि अंधाऱ्या कडेकपारीतून येणाऱ्या 'अराह' नदीचं पाणी याला येवून मिळतं. या सरोवराचे चार भाग झाले आहेत- हजरतबल, बोड दल, निगीन आणि गग्रीबल. यापैकी निगीन हे सगळ्यात खोल, तर गग्रीबल हे सर्वात उथळ आहे. (काहींच्या मते ब्रारी-नांबल धरून पाच खोऱ्यांचा समावेश आहे, याशिवाय असंख्य आंतर-जोडणाऱ्या वाहिन्या आहेत.) हे जगातलं सर्वात सुंदर सरोवर आहे आणि सर वॉल्टर लॉरेन्स त्यांच्या एका पुस्तकात लिहितात की, जगातल्या कोणत्याही भागात या सरोवराइतकी सुंदर जागा नाही. (आताचं याचं रूप पाहता या विधानावर विश्वास ठेवणं कठीण असलं तरी मी जेव्हा १९८५ मध्ये ते पाहिलं तेव्हा साऱ्या जगात ते जास्त सुंदर आहे, असं मलाही वाटलं. जवळपास सगळं जग पाहून झाल्यावरही माझं ते मत बदललेलं नाही.)

पर्यटन स्थळ म्हणून तलावाचे महत्त्व पाच शतकांहून अधिक जुने आहे. तलावाभोवती सुमारे पाचशे प्रसिद्ध मुघल बागा १६-१७ व्या शतकात तयार केल्या होत्या, परंतु यापैकी फक्त काही शिल्लक आहेत. हसन (१८३३) यांनी तारिख-इ-हसन या नावाने प्रसिद्ध असलेल्या काश्मीरच्या इतिहासात असे म्हटले आहे की, जुन्या काळात सध्याचे दाल सरोवराचे ठिकाण एक सपाट वाळवंट होते, जे विटालिनी मार्ग म्हणून ओळखले जात असे. राजा प्रवरसेनने बेहट नदी (आताची झेलम नदी) नोपोरा बाजूने बंद केली आणि कोहिमरण (ज्याला हरी परबत टेकडी असेही म्हणतात.) पायथ्याने नदी शहरात आणली. बऱ्याच काळानंतर, जेहलम नदीच्या प्रलयाचा परिणाम म्हणून राजा दुर्लब वर्धन (इ. स. ६२५-६६१) याच्या कारकिर्दीत वाळवंटाचे सरोवर बनले.

या भागातील सामाजिक, आर्थिक परिस्थिती बदलत असल्याने पाणी आधारित शेतीवरचा ताण वाढला आहे. एक पद्धती म्हणून दाल लेकवर पर्यावरणीय व जलशास्त्रीयदृष्ट्या खूप परिणाम झाला आहे. अलीकडच्या दशकात या भागात

अभूतपूर्व आणि अनियोजित शहरीकरण झालं आहे. प्रक्रिया न केलेलं सांडपाणी या सरोवरात जात असल्याने यातील पाण्याचा दर्जा उतरला आहे. शिवाय जंगलतोड, चरणं आणि शेतीचे क्रियाकलाप यामुळे सरोवरातील गाळ वाढला आहे व पोषक तत्व वाढत आहेत, ज्यामुळे कोणत्याही प्रकारची वनस्पती जोमात वाढत आहे. हे शहरातील सरोवर असल्याने घरगुती आणि नगरपालिकेचे सांडपाणी त्यात सोडले जाते. यामुळे तलावाच्या पृष्ठभागावरील पाण्याची संरचना बदलली आहे, ज्यामुळे इथे खाण्यास अनुपयोगी वनस्पतींचे तण वाढत आहेत. हे होतंय दालवर झालेल्या अतिक्रमणामुळे व पाण्यातील हाऊसबोटींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने पाण्यात जाणाऱ्या मानवी विष्ठेमुळे; शिवाय इथले लोक आणि हॉटेलं खूप कचरा टाकत असल्याने. वर्षानुवर्षे गाळ साचल्यामुळे आणि वनस्पतींच्या ढिगाऱ्यामुळे तलाव उथळ झाला आहे. जैविक समुदायांच्या संरचनेत अनेक अनिष्ट बदल झाले आहेत आणि काही महत्त्वाच्या प्रजाती एकतर कमी झाल्या आहेत किंवा पूर्णपणे नाहीशा झाल्या आहेत. पाण्याकडे झालेल्या या दुर्लक्षामुळे आणि दुरुपयोगामुळे सरोवराचं पाणी प्रदूषित होवून सरोवर नाशाकडे झुकत आहे.

पाण्यातील ऑक्सीजनची घनता कमी झाली आहे. फॉस्फरस आणि नायट्रोजन यांची पातळी मात्र वाढली आहे. काही ठिकाणी अल्गी वाढल्याने पाणी हिरवं झालं आहे. या पाण्यामुळे इथल्या लोकांना गॅस्ट्रोसारखे विकार होत आहेत.

या सर्व कारणांनी सरोवराचा आकार आक्रसत चालला आहे आणि छानशी जागा म्हणूनही याचं आकर्षण कमी होत आहे. जरी दाल लेक वाचवायचे सरकारचे प्रयत्न चालू असले तरी काश्मीरमधील सरोवराभोवती वाढणारी हॉटेलं, हाऊसबोटी आणि घरं बांधून राहणाऱ्यांची वस्ती वाढत आहे तोपर्यंत ते कठीण आहे. शिवाय तिथल्या सरकारने कायद्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे करणेही गरजेचे आहे. सरोवरात वा त्याच्या जवळ राहणाऱ्या लोकांची तक्रार अशी आहे की, त्यांच्या घरातला कचरा उचलायला तेथील नगरपालिकेची माणसं वरचेवर यायला हवीत, परंतु ती नेमाने येत नसल्याने ती लोकं वाट पाहून शेवटी गोळा केलेला कचरा पाण्यात फेकतात. पर्यटकांनीदेखील पाण्यात कचरा टाकणं टाळायला हवंय. सरोवरातील गाळ, कचरा आणि अल्गी काढणे हे आणखी काम आहे. लोकांची जागरूकता वाढवण्याने असे बदल होण्यात मदतच होईल. या सगळ्यामुळे सरोवर आणखी आक्रसण्यातून वाचेल. दाल सरोवर मानवी लोभाला बळी पडल्याने संपूर्ण परिसंस्था झपाट्याने बदलत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये दाल सरोवराच्या बिघडलेल्या परिस्थितीबद्दल समाजाच्या विविध क्षेत्रांतील लोकांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

स्वत:वरचा विश्वास ढळू देऊ नका...

स्वतःचा विचार केला असता आपल्या शरीरातील हृदय, फुफ्फुसे, पोट आणि आतडे हे आपल्याला किंवा डॉक्टरांना दिसणारे भाग आहेत आणि मन, आत्मा इत्यादी जाणवणारे पण न दिसणारे भाग आहेत. यापैकी प्रत्येक भाग आपल्याला वेळोवेळी काही ना काही सूचना देत असतो. आपण त्यांचा आदर करून तसा आचार ठेवला तर आपले आरोग्य निश्चितपणे चांगले राहू शकते. त्यामुळे स्वतःच्या शरीरावरील विश्वास कायम ठेवायला हवा.

सर्वात अगोदर हे समजावून घ्यायला हवे की स्वतःवरचा विश्वास हा प्रत्येकाचा आतला अनुभव असतो. तो नव्या विचारांशी प्रामाणिक राहण्याचा किंवा बांधिलकीचा अनुभव नसून स्वतःच्या हृदय, फुफ्फुसे इत्यादी अंतस्थ अवकाशावरील विश्वास असतो, नव्हे असायला हवा. मी माझे आयुष्य कसे घालवायचे याविषयी माझ्या ज्या कल्पना आहेत, त्यातील प्रत्येक क्षण, संवाद आणि नाती-गोती यांनी खरे तर आपण घडवले जातो.

स्वतःवरचा विश्वास ही केवळ दंतकथा नसून ते विज्ञानावर आधारित सत्य आहे. आपल्याला स्पर्श, रूप, रस, गंध आणि श्रवण ही पाच ज्ञानेंद्रिये माहिती आहेत, पण त्यात विज्ञानाने आता 'इन्टरोसेप्शन' हे इंग्रजी नाव असलेले आणखी एक इंद्रिय यात जोडले आहे. हे इंद्रिय तुमच्या शरीराच्या अंतर्गत सूचनांची माहिती घेते. साधे उदाहरण घ्यायचे तर सूचना असते, 'भूक लागली आहे', 'धडधड होते आहे' किंवा 'वॉशरूममध्ये जायचे आहे.' थोडक्यात, 'इन्टरोसेप्शन' म्हणजे शरीराची अंतर्गत संवेदना. आता लक्षात घ्या की, ज्या शरीरात 'इन्टरोसेप्शन' कमकुवत असते तेथे विविध प्रकारचे मानसिक त्रास अथवा आहाराचे, नैराश्याचे आणि काळजीचे विकार संभवू शकतात. शरीराची अंतर्गत संवेदना मोजण्यासाठी संशोधकांनी सात मार्ग सांगितले आहेत. त्यापैकी 'आपल्या शरीरावरील कमी झालेला विश्वास' ही मानसिक आरोग्याशी संबंधित अंतर्गत संवेदना आहे.

लक्षात घ्या की व्यसन कोणतेही असो, ते सोडत असताना एक वेळ अशी येते की मनावरचा ताण वाढतो आणि मन सैरभैर होते. याचे कारण असे असते की, आपण स्वतःवर नियंत्रण ठेवू शकत नाही असे आपल्याला वाटते. याचा परिणाम म्हणून नावडत्या गोष्टी घडायला लागतात. सगळे जण असतील अशा घरातील खोलीमध्ये जाण्याचीही माझी हिम्मत नसते. पण, यावेळी अंतर्गत संवेदनांचा विचार केला गेला तर आपण साधारण मनस्थितीत परत येऊ शकतो.

मानसिक आरोग्याच्या संदर्भात अंतर्गत संवेदना हा विषय अगदी अलीकडे प्रकाशात आला असला तरी ही संवेदना आणि त्यासोबतच आपला स्वतःच्या शरीरावरचा विश्वास वाढवणे हे जागरुकतेमुळे शक्य होते, हे मात्र पाहिले गेले आहे. ही जागरूकता केवळ स्व-नियंत्रणामध्ये नसावी, तर तुम्हाला आपल्या शारीरिक संवेदनांच्याबद्दल बारकाईने विचार करावा लागेल आणि एकटे असाल किंवा इतरांच्या सोबत असाल तेव्हाही या बद्दल जागरूक राहावे लागेल. त्यानंतर हा तुमचा शारीरिक अनुभव होईल आणि त्यातून तुमचा 'स्वतःच्या शरीरावरील विश्वास' तयार होईल.

अनोखा सागरीमार्ग!

प्राचीन काळात पृथ्वी निर्मितीच्या प्रक्रियेत ज्या ज्या प्रक्रिया झाल्या त्याचे पडसाद आजही अनेक आश्चर्यकारक रचनांच्या स्वरूपात आढळतात. क्रेटेशियस सागरीमार्ग हा असाच एक सुंदर सागरीमार्ग होता, ज्याच्या प्रक्रियेमध्ये एक विशाल जीवन नष्ट झाले जे आजही तिथे जीवाष्मांच्या स्वरूपात सापडते आणि हे जीवाश्म अतिशय सुंदर आणि मनमोहक आहेत!

अमेरिकेच्या आतील खंडातील पुरातन क्रेटेशियस खडक टेक्सास ते मॉन्टाना या प्रदेशाचा एक दीर्घ भूवैज्ञानिक घटनांच्या इतिहासाची साक्ष नोंदवतात. याला वेस्टर्न इंटिरियर सागरीमार्ग म्हणतात. समुद्राच्या तुलनेने हा भाग उथळ आहे. डायनासोर युगाच्या शेवटी वेस्टर्न इंटिरियर सागरीमार्गाने उत्तर अमेरिकेचे दोन भाग केले आणि मेक्सिकोचे प्राचीन आखात आर्क्टिक महासागराशी जोडले. पृथ्वीच्या इतिहासाच्या या कालावधीत भूगर्भशास्त्रज्ञांनी पश्चिम उत्तर अमेरिकेला 'लारामिडिया' आणि पूर्व उत्तर अमेरिकेला 'ॲपलाचिया' ही नावे दिली आहेत.

अपृष्ठवंशी आणि पृष्ठवंशी प्राण्यांच्या असंख्य प्रजाती वेस्टर्न इंटिरियर सागरीमार्गामध्ये राहतात आणि वेस्टर्न इंटिरियर सागरीमार्गाच्या काळात जमा झालेल्या गाळाच्या खडकांमध्ये जीवाश्म सापडतात.

या सागरीमार्गाचा सर्वात प्राथमिक टप्पा क्रेटेशियसच्या मध्यात सुरू झाला. क्रेटेशियस काळात, प्राचीन फॅरलॉन आणि कुला टेक्टोनिक प्लेट्स उत्तर अमेरिकन प्लेटच्या खाली येण्याच्या प्रक्रियेत होत्या. यामुळे अच्छादित जमीन दुभंगली आणि एक मोठे बॅक-आर्क बेसिन तयार झाले. क्रेटेशियस काळात समुद्र पातळी वाढण्यादरम्यान किंवा उल्लंघनादरम्यान महासागराचे पाणी बेसिनमध्ये भरू लागले. यामुळे वेस्टर्न इंटिरियर सागरीमार्गाची निर्मिती झाली. याच प्रक्रियेत मॉवरी समुद्राची निर्मिती झाली, म्हणून त्याला मॉवरी शेल नाव देण्यात आले. ही अशी एक वैशिष्ट्यपूर्ण खडक निर्मिती आहे, जी तेलाच्या शेलने समृद्ध आहे. दक्षिणेला मेक्सिकोचे आखात हे टेथिस समुद्राचा विस्तार होता, जो क्रेटेशियसच्या उत्तरार्धात मॉवरी समुद्राला मिळाला आणि 'संपूर्ण' समुद्रमार्ग तयार झाला. प्लेट्स कमी झाल्यामुळे त्या समुद्रमार्गाच्या काठावर अंशतः



वितळल्या. यामुळे ज्वालामुखीसमान क्रिया घडली, जी आज अनेक स्तरांमध्ये जतन केलेल्या राखेच्या किंवा बेंटोनाइट्सच्या थरांच्या स्वरूपात दिसते. या राखेच्या थरांचे वय काढता येऊ शकते. या राखेच्या थरांचे वय वेस्टर्न इंटिरियर सागरीमार्गावर असलेल्या खडकांशी जुळते.

पुढील टेक्टोनिक गतीविधींमुळे वेस्टर्न इंटिरियर सागरीमार्गाला समुद्र पातळीतील अनेक चढ-उतारांचा अनुभव आला. अखेरीस क्रेटेशियसच्या शेवटच्या टोकाजवळ सागरीमार्ग बंद झाला आणि उत्तर अमेरिकेच्या पश्चिमेकडील प्रादेशिक उन्नती आणि पर्वत-बांधणीमुळे हळूहळू नाहीसा झाला. त्याच्या सर्वात मोठ्या भागात तो रॉकीजपासून पूर्वेकडील ॲपलाचियन्सपर्यंत पसरलेला आहे आणि सुमारे १००० किमी रुंद आहे. त्याच्या सर्वात खोल भागात तो फक्त ८०० किंवा ९०० मीटर खोल असावा आणि समुद्राच्या तुलनेने ही खोली उथळ आहे.

वेस्टर्न इंटिरियर सागरीमार्गाचे पाणी उबदार, उथळ आणि सागरी प्राण्यांचे वैविध्यपूर्ण वास्तव्य असलेले होते. यामध्ये मोठ्या हाडाचे मासे, शार्क, १८ मीटर लांबीपर्यंत वाढणारे मोसासॉर, इचथिओसॉर आणि प्लेसिओसॉरसारखे सागरी सरपटणारे प्राणी, पक्षी, अमोनाईट्स, बायव्हॅल्व्ह एकिनोडर्म्स आणि क्रिनोइड्स यांचा समावेश होता. मोसासॉर हा जलचर स्क्वामेट सरपटणाऱ्या प्राण्यांचा एक नामशेष गट आहे. क्रेटेशियसच्या शेवटच्या टप्प्यात ते सुमारे ८.२ ते ६.६ कोटी वर्षांपूर्वी अस्तित्वात होते. इचथिओसॉर हे देखील सरडे आणि साप या प्रकारातले आणि सर्वात वैशिष्ट्यपूर्ण जलचर सरपटणारे प्राणी होते, परंतु ते डायनासोर नव्हते. प्लेसिओसॉर म्हणजे लांब मानेचा सागरी सरपटणाऱ्या प्राण्यांचा समूह. हे ट्रायसिक कालखंडाच्या उत्तरार्धापासून क्रेटेशियस कालखंडाच्या उत्तरार्धात म्हणजे २१.५ ते ६.६ कोटी वर्षांपूर्वी अस्तित्वात होते आणि आज जीवाश्म स्वरूपात आढळतात. पंख असलेले टेरोसॉरदेखील वरून उडत होते. वेस्टर्न इंटिरियर सागरीमार्गावर अधूनमधून ऑक्सिजन कमी किंवा नष्ट होत असे. या प्रक्रियेला एनॉक्सिया म्हणतात. यामुळे वेस्टर्न इंटिरियर सागरीमार्गाच्या तळाशी बुडलेले मृत प्राणी हळूहळू विघटित झाले आणि आज ते जीवाष्मांच्या स्वरूपात आढळतात.

तेथे मुबलक प्रमाणात शार्क होते. स्क्वॅलिकोरॅक्स आणि मोठ्या हाडांचे मासे ज्यात पॅचिरायझोडस, एन्कोडस, अक्राळविक्राळ इचथियोडेक्टेस आणि १८ फूट लांब झिफॅक्टिनस होते. झिफॅक्टिनस मासा इतर अस्तित्वात असलेल्या हाडांच्या माशांपेक्षा मोठा होता. इतर सागरी जीवनामध्ये मॉलस्क (गोगलगाय, कालवं यांसारखे मृदू शरीर व अंगावर कवच असणारे प्राणी), अमोनाईट्स (एक विलुप्त सागरी प्राणी जो अनेकदा सपाट, सर्पिल शेलसह जीवाश्म म्हणून आढळतो), स्क्विडसदृश बेलेमनाइट्स आणि कोकोलिथोफोरेस, फोरामिनिफेरन्स आणि रेडिओलेरियन्ससह प्लँक्टन यासारख्या अपृष्ठवंशीय प्राण्यांचा समावेश होतो.

वेस्टर्न इंटिरियर सागरीमार्गाच्या आधुनिक पाऊलखुणा म्हणजे आज तिथे सापडणारी जीवाष्म विविधता. पियरे शेल आणि ऑस्टिन चॉकसारख्या प्रसिद्ध ठेवी तर आहेतच, शिवाय न्यू मेक्सिको ते नॉर्थ डकोटापर्यंतच्या संपूर्ण अमेरिकेमधील सागरी ठेवींमध्ये वेस्टर्न इंटिरियर सागरीमार्गाच्या खुणा अजूनही आढळतात. वेस्टर्न कॅन्ससचे 'मोन्युमेंट रॉक्स' हे सर्वात उल्लेखनीय आहेत, ज्यामध्ये मोठ्या निओब्रारा फॉर्मेशनच्या स्मोकी हिल्स चॉकचा समावेश आहे.

या लुप्त सागरीमार्गाने जीवाश्मांचा अतिशय देखणा ठेवा आपल्यासाठी दिला आहे. आजही हे जीवाश्म पाहण्यासाठी दूरवरून लोक येत असतात.

मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुसरा मजला, प्रभाग समिती ४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता. जि. ठाणे - ४०११०७, दुरध्वनी क्र. २८१०३४०९.

जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/३६/२०२४-२५ दिनांक : १८/०४/२०२४

// जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	ठिकाण	वृक्षांची नावे	वृक्षांची संख्या	मुळासहित काढणे/ पुन:रोपण करणे	तपशील
१	मिरारोड (पु.) येथिल कविश फॅशन प्रा.लि. कंपनीच्या गेट समोर असलेल्या मनपाच्या गटारात असून झाडाची मुळे वाढलेली असल्याने गटार नेहमी चौकप होत असते व पावसाळ्यात सदरचे पाणी कंपनीच्या आतमध्ये जात असते साफसफाई करताना अडथळा निर्माण होत आहे. या कारणास्तव सदरील झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **कविश फॅशन प्रा.लि. यांचे दि. २२/०३/२०२४ रोजीचे पत्र.**	उंबर	०१	मुळासहित काढणे	धोकादायक

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या का-ही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती / सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही

जा.क्र. मनपा/मावज/ए-1832475/2024-25
दि. १९/०४/२०२४

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

कर्करोगापासून रक्षण करेल लीची

- लीचीच्या पल्पमध्ये फ्लॅवोनॉइड्स असतात ज्याने कर्करोगापासून रक्षण होतं. या फळात असणारे फ्लॅवोन्स, क्वेरसिटिन, केमफेरोलसारखे तत्त्व कॅन्सरच्या पेशीची वाढ थांबवण्यात मदत करतात.
- लीचीत पॉलीफेनॉल्स असतं जे हृदयाच्या आरोग्यासाठी उत्तम आहे. जे लोकं रोज एक ग्लास लीची सरबत पितात त्यांचं ब्लड प्रेशर सामान्य राहतं.
- लीचीमध्ये असलेले सॉल्यूबल फायबरने पचनशक्ती चांगली राहते. याने पोटात जळजळ आणि आतड्यांसंबंधी तक्रार उद्भवत नाही.
- लीचीमध्ये फॉस्फरस आणि मॅग्निशियमची मात्रा भरपूर असते. लहान मुलांसाठी हे खूप फायदेशीर असून यात कॉपर आणि मॅगनीजसारखे मिनरल्स असल्याने लीची हाडांसाठीदेखील फायदेशीर आहे.
- लीचीमध्ये कॅलरीज खूप कमी असते म्हणून ज्यांना वजन कमी करायचं असेल त्यांनी रोज लीची खायला हवी.

हिवाळ्यात त्वचेची काळजी घेण्यासाठी
कोरफडीचा फेस पॅक लावा

थंड हवामानात त्वचेची अतिरिक्त काळजी घेणे आवश्यक असते जेणे करून त्वचा अधिक मऊ दिसते. या ऋतूमध्ये त्वचेची काळजी घेण्यासाठी कोरफडीचा वापर करणे खूप चांगले मानले जाते. खरं तर कोरफड अनेक प्रकारच्या त्वचेच्या समस्या नैसर्गिक पद्धतीने दूर करू शकते. अशाच काही फेस पॅकबद्दल सांगत आहोत, जे तुम्ही हिवाळ्यात सहज बनवू शकता आणि त्वचेची काळजी घेऊ शकता. चला तर मग जाणून घेऊ या. हे फेस पॅक कसे बनवायचे.

कोरफड आणि मधाचा फेसपॅक

जर तुम्हाला हिवाळ्यात तुमच्या कोरड्या त्वचेमुळे त्रास होत असेल तर तुम्ही कोरफड आणि मधाच्या मदतीने फेस पॅक बनवू शकता.

आवश्यक साहित्य : २ चमचे कोरफड जेल, एक चमचा मध, एक चमचा गुलाबजल

फेस पॅक बनवण्याची पद्धत

- फेस पॅक बनवण्यासाठी सर्वप्रथम कोरफडीचे पान तोडून त्याचे जेल काढा.
- आता या जेलमध्ये मध आणि गुलाबजल मिसळा.
- यानंतर चेहरा स्वच्छ केल्यानंतर हा पॅक चेहऱ्यावर लावा आणि अगदी हलक्या हातांनी मसाज करा.
- सुमारे १० मिनिटांनंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा.

कोरफड जेल आणि टी ट्री ऑइल फेस पॅक

जर तुमची त्वचा खूप तेलकट किंवा मुरुम असतील तर तुम्ही हा फेस पॅक लावू शकता.

आवश्यक साहित्य : २ चमचे कोरफड जेल, १ टीस्पून गुलाबजल, टी ट्री ऑईल २-३ थेंब

कसे वापरायचे

- सर्वप्रथम कोरफडीचे पान तोडून त्याचे जेल काढा.
- आता या जेलमध्ये गुलाब पाणी आणि टी ट्री ऑइलचे २-३ थेंब घाला.
- आता हा पॅक १५-२० मिनिटे चेहऱ्यावर लावा आणि नंतर धुवा.
- हा फेसपॅक तुम्ही आठवड्यातून एकदा किंवा दोनदा लावू शकता.

कोरफड आणि व्हिटॅमिन ई-फेस पॅक बनवा

जर तुम्हाला हिवाळ्यात तुमच्या त्वचेला चांगले पोषण द्यायचे असेल तर व्हिटॅमिन ई-ऑईल कॅप्सूलमध्ये कोरफड जेल मिसळा.

आवश्यक साहित्य : २ चमचे कोरफड जेल, एक व्हिटॅमिन ई कॅप्सूल

कसे वापरायचे –

- सर्वप्रथम कोरफडीचे पान तोडून त्याचे जेल काढा.
- यानंतर भांड्यात व्हिटॅमिन ई कॅप्सूलचे तेल मिसळा.
- आता चेहरा धुवून हा पॅक लावा.
- सुमारे दहा मिनिटांनंतर पाण्याने चेहरा धुवा.

ब्रश करूनही मुलांच्या तोंडातून दुर्गंधी येत असेल तर हे उपाय करा

मुलांच्या तोंडाच्या काळजीसाठी डॉक्टर अनेकदा मुलांना दररोज रात्री झोपण्यापूर्वी आणि सकाळी उठल्यानंतर ब्रश करण्याचा सल्ला देतात. त्याचबरोबर मुलांची विशेष काळजी घेण्यासाठी पालकही मुलांना ब्रश करायला विसरत नाहीत. मात्र रोज ब्रश करत असतानाही काही मुलांच्या तोंडातून वास येऊ लागतो. अशा परिस्थितीत जर तुमच्या मुलाच्या तोंडातून दुर्गंधी येत असेल तर ती काही मार्गांनी दूर केली जाऊ शकते.

अनेक वेळा तोंडाची काळजी घेण्याचा उत्तम दिनक्रम पाळला तरी मुलांच्या तोंडातून वास येऊ लागतो. त्याचबरोबर अनेक महागडे ओरल केअर प्रोडक्ट्स वापरूनही तोंडाची दुर्गंधी कमी होण्याचे नाव घेत नाही. अशा परिस्थितीत मुलांच्या तोंडातून येणाऱ्या दुर्गंधीमागील कारण शोधून तुम्ही ही समस्या क्षणार्धात दूर करू शकता. चला तर मग जाणून घेऊया मुलांच्या तोंडाची दुर्गंधी दूर करण्याचे उपाय.

दात नीट घासून घ्या

काही वेळा लहान मुले स्वतः ब्रश करण्याचा आग्रह धरतात. त्याच वेळी, स्वतः ब्रश करताना, मुले त्यांच्या दातांमध्ये अडकलेले अन्न पूर्णपणे काढून टाकण्यास सक्षम नाहीत. त्यामुळे मुलांच्या तोंडात बॅक्टेरिया तयार होतात आणि त्यांच्या तोंडातून दुर्गंधी येऊ लागते. म्हणूनच मुलांनी दिवसातून दोनदा दात घासणे आवश्यक आहे.

जीभ स्वच्छ करणे

काही मुले ब्रश केल्यानंतर जीभ साफ करणे टाळतात. अशा स्थितीत जिभेवरील जंतू आणि बॅक्टेरिया दुर्गंधीचे कारण बनतात. त्यामुळे ब्रश केल्यानंतर मुलांना टंग क्लीनर वापरण्याचा सल्ला द्या.

तोंडाचा संसर्ग

काही वेळा मुलांच्या हिरड्यांना संसर्ग होतो. त्यामुळे मुलांच्या तोंडाला दुर्गंधी येऊ लागते. अशावेळी मुलांच्या हिरड्यांना संसर्ग झाल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा. तसेच मुलांचे तोंड नियमितपणे स्वच्छ करत रहा. त्यामुळे त्यांचा संसर्ग लवकर बरा होईल.

पाणी पिण्याची शिफारस करा

काही वेळा कमी पाणी घेऊनही मुलांचे तोंड कोरडे होते. त्यामुळे त्यांच्या तोंडातून दुर्गंधी येऊ लागते. अशा परिस्थितीत मुलांना हायड्रेट ठेवण्यासाठी भरपूर पाणी पिण्याचा सल्ला द्या. तसेच मुलांना अंगठा चोखण्यापासून किंवा तोंडात बोट घालण्यापासून परावृत्त करा.

आजच्या युगात प्रत्येकाला खासगी सरकारी नोकरी किंवा बहुराष्ट्रीय कंपनीत चांगल्या पगारात नोकरी करायची असते. पण आजच्या काळात नोकरी सहजरीत्या मिळणे अवघड आहे. कोणाला सरकारी नोकरी मिळवायची असते, तर कोणाला डॉक्टर व्हायचे असते. कोणाला शिक्षक तर कोणाला इंजिनीयर व्हायचे असते. आजच्या युगात अशी अनेक क्षेत्रे आहेत जिथे करिअरच्या अनेक संधी आहेत. आपण इंटिरियर डिझायनिंगच्या क्षेत्रात देखील आपले करिअर करू शकता. हे केल्याने आपल्याला एखाद्या कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी मिळू शकते. आपल्याला कंपनीत नोकरी करायची नसल्यास आपण स्वतःचे ऑफिसदेखील उघडून चांगली कमाई करू शकता.

इंटिरियर डिझायनिंग म्हणजे काय?

इंटिरियर डिझाइन हा एक बहुआयामी व्यवसाय आहे. इंटिरियर डिझायनर घर, ऑफिस, दुकानाच्या सजावटीपासून इतर प्रकारच्या इमारतींपर्यंत सजावट करतो. याला इंटिरियर डिझायनिंग म्हणतात. इंटिरियर डिझायनिंगचे काम खूप सर्जनशीलतेशी निगडित आहे, त्यामुळे हे करिअर स्वीकारण्यापूर्वी सर्जनशीलता असणे अत्यंत आवश्यक आहे. आजकाल लोकांचा घर आणि ऑफिस सजवण्याचा ट्रेंड झपाट्याने वाढला आहे. त्यामुळेच इंटिरियर डिझायनर्सची मागणी प्रचंड वाढली आहे. घर, दुकान, ऑफिस किंवा शोरूम डिझाइन करणे असो, इंटिरियर डिझायनरचे काम त्याला सर्वोत्तम लूक देणे असते.

इंटिरियर डिझायनिंग हे अतिशय वेगाने वाढणारे क्षेत्र आहे. जर तुम्हाला या क्षेत्रात तुमचे करिअर घडवायचे असेल तर तुमच्यासाठी सर्जनशील असणे खूप गरजेचे आहे. इंटिरियर डिझायनिंगमधील कोणत्याही एका क्षेत्रात स्पेशलायझेशनही करता येते, याअंतर्गत तुम्ही किचन डिझायनिंग, रूम डिझायनिंग, ऑफिस डिझायनिंग, बिझनेस डिझायनिंग आणि बाथरूम डिझायनिंगमध्ये स्पेशलायझेशन करू शकता. आजकाल या क्षेत्रात खूप विस्तार होत असल्यामुळे तरुणांना नवनवीन संधी निर्माण होत आहे. इंटिरियर डेकोरेटरचे उत्पन्न हे त्यांनी केलेल्या कामावर अवलंबून असते. तुम्ही कोणत्याही कंपनीत नोकरी करायची म्हटलं तर तुमची सुरुवात १५-२५ हजार रुपये होऊ शकते. हा पगार तुमच्या अनुभव आणि कार्यशैलीनुसार वाढू शकतो, जो ४०-५० हजार रुपये देखील असू शकतो.

इंटिरियर डिझायनरचे गुण

कार्यक्षेत्र कोणतेही असो, माणसामध्ये त्यासंबंधी आवश्यक गुण असणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरून ग्राहकाला त्यांच्या गरजेनुसार काम करून त्यात कौशल्य मिळवू शकता.

म्हणूनच इंटिरियर डिझायनरला कलात्मक असणं खूप महत्त्वाचं असतं.

- कोणत्याही इंटिरियर डिझायनरमध्ये सर्जनशीलता आणि तंत्रज्ञानाची समज असणे खूप महत्त्वाचे आहे.
- बाजारातील ट्रेंड्ससोबत नेहमी अपडेट असायला हवे कारण आजकाल लोक एकमेकांकडे बघूनच काम करतात. म्हणूनच, जोपर्यंत तुम्हाला बाजारात चालणारा ट्रेंड समजत नाही, तोपर्यंत तुम्हाला काही अडचणींचा सामना करावा लागू शकतो.
- ग्राहकांशी तुमचे व्यवहार मैत्रीपूर्ण असावेत. यामुळे तुम्ही आणि ग्राहक यांच्यात परस्पर समज आणि विश्वास निर्माण होतो.
- त्यात ग्राहकांच्या मागणीनुसार काम करण्याची क्षमता असावी.
- रचना करताना कलात्मकता आणि तार्किक बुद्धिमत्ता असणे देखील खूप महत्त्वाचे आहे.
- इंटिरियर डिझायनरने ग्राहकाच्या बजेटनुसार उत्तम दर्जाची सुविधा देणे अत्यंत आवश्यक आहे.

पात्रता

इंटिरियर डिझायनिंग कोर्स करण्यासाठी शैक्षणिक पात्रता किमान १२वी उत्तीर्ण असावी आणि मिळालेल्या गुणांची टक्केवारी किमान ५५% असावी. जर तुम्ही कलाक्षेत्रातून १२वी उत्तीर्ण झाला असाल तर तुमच्यासाठी तो प्लस पॉइंट असेल. याशिवाय तुमच्या कलेची आवड आणि चित्रकलेचे ज्ञान, संगणकाचे ज्ञान आणि सर्जनशील क्षमता असणेही खूप महत्त्वाचे आहे. १२वी उत्तीर्ण झाल्यानंतर तुम्ही पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम करू शकता. जर तुम्हाला इंटेरियर डिझायनिंग पदवी अभ्यासक्रम करायचा असेल, तर पदवीनंतरही तुम्ही पीजी डिप्लोमा, पदवी अभ्यासक्रम करू शकता.

इंटिरियर डिझायनिंग कोर्सेस कुठून करावे

भारतातील काही संस्था इंटिरियर डिझायनिंगमध्ये एक वर्षाचा डिप्लोमा कोर्स देखील देतात. सहा महिने ते पाच वर्षे कालावधीचे हे अभ्यासक्रम विविध अशासकीय आणि सरकारी संस्थांमधून करता येतात. डिझाईनच्या क्षेत्रात इंटिरियर डिझायनिंग स्कूल ऑफ इंटिरियर अहमदाबाद येथे पाच वर्षांचा कोर्सदेखील उपलब्ध आहे.

माव्याशिवाय गाजराचा हलवा

हिवाळ्यात गाजराचा हलवा खाण्याची मज्जाच काही वेगळीच आहे. जर तुम्हाला हिवाळ्यात गरमागरम गाजराचा हलवा खायला मिळत असेल तर यापेक्षा चविष्ट अजून काय असू शकतं. गाजराचा हलवा खाण्यास अतिशय चविष्ट असून आरोग्याच्या दृष्टीने अतिशय पौष्टिक असतो. तुम्ही घरीही गाजराचा हलवा सहज बनवू शकता. गाजराचा हलवा अनेक प्रकारे बनवला जातो. काही लोक माव्यापासून गाजराचा हलवा बनवतात, तर काही लोक माव्याशिवाय गाजराचा हलवा फक्त दुधाने बनवतात. बाजारातील मिळणाऱ्या माव्यासोबत गाजराचा हलवा खाल्ला असेल पण आज आम्ही तुम्हाला माव्याशिवाय गाजराचा हलवा कसा बनवायचा, हे सांगत आहोत. बाजारातील गाजर हलव्यापेक्षा हा हलवा चवीला चांगला लागतो. चला तर मग रेसिपी जाणून घ्या.

साहित्य : गाजर १ किलो, दूध (फूल क्रीम) १-१/२ लिटर, साखर २५० ग्रॅम, चिरलेले काजू, चिरलेले बदाम, मनुका प्रत्येकी १०, पिस्ता चिरलेला, वेलची पावडर अर्धा टीस्पून, तूप १ टेस्पून.

पाककृती : प्रथम गाजर सोलून किसून घ्या. आता गाजर आणि एक कप पाणी घालून प्रेशर कूकरमध्ये एक शिट्टी येईपर्यंत शिजवा. कूकर उघडल्यावर गाजरातील सर्व पाणी काढून टाका. मध्यम आचेवर कढईत तूप टाकून गरम करायला ठेवा. आता कढईत तूप गरम करून त्यात गाजराचे मिश्रण शिजवून घ्या. आता त्यात दूध घालून ढवळत असताना दूध घट्ट होईपर्यंत शिजवा. सर्व दूध सुकल्यावर गाजरात साखर घालून मिक्स करा. साखरेचे पाणी सुकल्यावर त्यात वेलची पावडर आणि ड्रायफ्रुट्स घालून मिक्स करा. गाजर, दूध आणि साखरेचे पाणी सुकले की हलवा तयार आहे. गरमागरम स्वादिष्ट गाजर हलवा सर्व्ह करा.

त्वचा आणि केसांची काळजी घ्या
नारळाचं तेल आणि तुरटी वापरा

आजच्या काळात प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या सौंदर्याच्या समस्येने त्रस्त आहे. काहींच्या चेहऱ्यावर मुरुम असतात तर काहींची त्वचा खूप कोरडी असते. काहीजण केस गळण्याने हैराण आहेत तर काहींना कोंड्याची समस्या आहे. साधारणपणे लोक त्यांच्या विविध सौंदर्य समस्यांवर उपाय बाजारात उपलब्ध असलेल्या उत्पादनां मध्ये शोधतात. तरीही त्याचा काहीही उपयोग होत नाही. यावर तर सर्व समस्यांचे समाधान घरातच आहे. तुरटी आणि खोबरेल तेलाचा वापर केल्यास सौंदर्याच्या अनेक समस्यांपासून सहज सुटका मिळते. चला तर मग जाणून घेऊया –

मृत त्वचेच्या पेशींपासून सुटका

त्वचेवर मृत त्वचेच्या पेशींच्या उपस्थितीमुळे त्वचा निस्तेज आणि टोन देखील दिसते. अशावेळी तुम्ही खोबरेल तेल हलके गरम करा आणि नंतर त्यात तुरटी पावडर घाला. आता हे मिश्रण चेहऱ्यावर लावा. सुमारे अर्ध्या तासानंतर त्वचा स्वच्छ करा. मृत त्वचा काढून टाकण्यासाठी धुण्यापूर्वी त्वचेला हलक्या हातांनी मसाज करा, जेणेकरून सर्व मृत त्वचा निघून जाईल.

टॅनिंगपासून सुटका

चेहऱ्यावर आणि हात-पायांवर टॅनिंग होत असेल आणि डेड स्किनमुळे स्किन टोन फिकट होत असेल, तर खोबरेल तेल आणि तुरटी पावडरचे मिश्रण अशा प्रकारे लावल्याने लवकरच फरक दिसेल.

कोंड्यापासून सुटका

केसांमधील कोंड्यामुळे खूप केस गळतात. त्याच वेळी, टाळूमध्ये खाज आणि जळजळ देखील त्रास देते. केसांमध्ये अशी समस्या असल्यास, त्यामुळे खोबरेल तेल आणि तुरटी एकत्र करून केसांना लावा. त्यानंतर तासाभराने केस शॅम्पूने धुवा. यामुळे केस गळणे थांबते आणि नवीन केस लवकर वाढतात.

त्वचा तरुण बनते

जर तुम्हाला तुमची त्वचा जास्त काळ तरुण ठेवायची असेल तर तुरटी आणि खोबरेल तेलाचे मिश्रण चेहऱ्यावर लावा. असे केल्याने त्वचा घट्ट होण्यास मदत होते. याव्यतिरिक्त सुरकुत्या आणि फाईन लाईन्स देखील कमी करते.

गुणसंपन्न बोर

बोर सर्वांच्याच परिचयाचे असते. मात्र त्याचे झाड फारच कमी लोकांनी पाहिलेले असते. झुडुपवजा दिसणारे हे झाड काही ठिकाणी १० मीटरपर्यंत उंच वाढलेले दिसून येते. माळरानावर दिसणारे हे झाड पानगळीच्या वनात देखील दिसते. बोराचे शास्त्रीय नाव Ziziphusmauritiana / Ziziphus jujube असे आहे. बोराच्या झाडासारखे दिसणारे तोरण (वेल) हे आर्द्र पानगळीच्या निमसदाहरित झाडासारखे वनात दिसून येते. जंगलात गेल्यावर बोर हे झाड ओळखायचे असेल तर त्याची वरून हिरवी असलेली आणि खालच्या बाजूने पांढरट चंदेरी रंग असलेली पाने ही उपयुक्त खूण ठरू शकते. पानाला मुख्य तीन शिरा ठळकपणे दिसतात. पानाजवळ छोटे काटे असतात. क्वचित जोडीने येणारे काटे कधी कधी वळलेले असतात. त्यामुळे शेळ्यांना पाने खायला अडथळा येऊ शकतो. पिवळसर पांढऱ्या बारक्या (२-४ सेंमी)फुलांमुळे पावसाळ्यात हे झाड काटेरी असूनदेखील अतिशय आकर्षक दिसते. बऱ्याच वेळा फुले फुलण्याचा काळ भौगोलिक परिस्थितीमुळे थोडा बदललेला दिसतो. बोराची फळे गोलसर असतात. पिकल्यावर ती पिवळ्या-गडद बदामी रंगाची दिसतात.

बोराच्या झाडावर छोट्या पिवळ्या, राखाडी चिमण्यांची घरटी दिसून येतात. विहिरीच्या काठावर असणाऱ्या बोराच्या झाडावर १०-१५ च्या संख्येने सुगरणीची घरटी आढळून येतात. झाडांच्या पानावर कॉमन पिरो, कॉमन सिल्व्हरलाईन फुलपाखराच्या अळ्या आढळून येतात. पक्षी, फुलपाखरांकरिता उपयुक्त असणाऱ्या या झाडाच्या लाकडाचा उपयोग ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर वेगवेगळ्या प्रकारची अवजारे बनवण्याकरिता केला जातो. जळाऊ लाकूड म्हणून तर सर्रास उपयोग केला जातो. आयुर्वेदात बोराचे मूळ, फळ, फुले, औषधे बनवण्याकरिता वापरले जाते. फळे पौष्टिक असून त्यापासून चविष्ट लोणचे करता येते.

जिओचे ५जी नेटवर्क येत नाहीये ? फॉलो करा या सोप्या टिप्स, मिळवा भन्नाट स्पीड

आतापर्यंत जवळपास ३० शहरांमध्ये जिओ ५जी सुरू झाले आहे. जिओ ५जी सेवा सध्या बीटा टप्प्यात आहे, म्हणून ती केवळ निवडक युजर्ससाठी वेलकम ऑफरच्या इन्व्हाईटद्वारे उपलब्ध करून दिली जात आहे. २०२३ पर्यंत देशभरात ५जी सेवा रोलआऊट करण्याची घोषणा रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांनी केली आहे. १० ऑक्टोबरपासून सुरू झालेली जिओची ५जी सेवा आता देशातील अनेक शहरांमध्ये सुरू झाली आहे. कंपनी त्याचा सतत विस्तार करत आहे. अशात जर तुमच्या शहरात जिओ ५जी सेवा आहे. परंतु, तुम्ही ती वापरण्यास सक्षम नसाल तर, तुम्हाला या महत्त्वाच्या गोष्टी माहिती असणे आवश्यक आहे, ज्या तुम्हाला जिओ ट्रू ५जी सेवा वापरण्यास मदत करू शकतात. जाणून घेऊया सविस्तर.

५जी स्मार्टफोन

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ५जी इंटरनेटसाठी तुमच्याकडे ५जी स्मार्टफोन असणे आवश्यक आहे. तुमच्याकडे ५जी तयार स्मार्टफोन असेल तेव्हाच तुम्ही ५जी नेटवर्क वापरू शकाल. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे ५जी फोनमध्येही ५जी इंटरनेट वापरण्यासाठी, ५जी सपोर्टसाठी फोन अपडेट करणे अत्यंत आवश्यक आहे.

जिओ प्लानची निवड

जिओने अद्याप कोणताही ५जी प्लान जारी केलेला नाही. परंतु, जिओ ५जी नेटवर्क वापरण्यासाठी तुमच्या नंबरवर २३९ रुपये किंवा त्याहून अधिकचा प्लान सक्रिय असेल तर तुम्ही जिओ वेलकम ऑफर्ससाठी पात्र असाल.

जिओ वेलकम ऑफर

जिओ युजर्सना ५जी वापरण्यासाठी इन्व्हाईट करण्यासाठी जिओ ट्रू ५जी वेलकम ऑफर जारी करण्यात आली आहे. वेलकम ऑफरचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांना rGbps+ पर्यंतच्या स्पीडसह अमर्यादित ५जी डेटा मिळेल. जसजशी शहरे ५जीसाठी तयार होतील, तसतशी बीटा चाचणी सेवा इतर शहरांमध्ये आणण्याची घोषणा केली जाईल. शहरातील नेटवर्क कव्हरेज पुरेसे मजबूत होईपर्यंत युजर्स या बीटा चाचणीचा लाभ घेऊ शकतील. इन्व्हाईट केलेल्या 'जिओ वेलकम ऑफर' युजर्सना त्यांचे विद्यमान जिओ सिम बदलावे लागणार नाही. जेव्हा मोबाईल ५जी असेल तेव्हा जिओ ट्रू ५जी सेवा आपोआप अपग्रेड होईल.

अशा प्रकारे मिळेल जिओ ५जी चा फायदा

वरील सर्व निकषांची पूर्तता केली असतानाही तुमच्या फोनमध्ये ५जी नेटवर्क येत नसेल, तर जिओ ची ऑफर मिळवण्यासाठी सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या फोनमध्ये मायजिओ ॲप इंस्टॉल करावे लागेल. ॲप उघडा आणि लॉगिन करा. आता तुम्ही जिओ ५जी रोलआऊटच्या शहरात असाल तर तुम्हाला होम स्क्रीनवर 'जिओ वेलकम ऑफर' लिहिलेले दिसेल. पर्याय दिसत नसल्यास पेज रिफ्रेश करा. या कार्डवर टॅप केल्यानंतर, तुम्ही जिओ च्या ५जी सेवांचा लाभ घेऊ शकाल आणि तुमची नोंदणी केली जाईल.

भूक नसतानाही खाणे शरीरासाठी अपायकारक

भूक नसतानाही काहीतरी खाण्याची सवय तुमच्या शरीरासाठी हानीकारक ठरू शकते. थोड्या थोड्या वेळाने खात राहणे चांगले असते, मात्र भूक नसताना खाणे आरोग्यासाठी चांगले नव्हे. शिकागोच्या इलिनोईस युनिव्हर्सिटीतील डेव्हिड गाल यांनी याबाबत ४५ विद्यार्थ्यांचे निरीक्षण केले. सुरुवातीला यांच्या भुकेबाबतची माहिती मिळवण्यात आली. त्यानंतर यांना कार्बोहायड्रेटयुक्त भोजन देण्यात आले. त्यानंतर त्यांच्या रक्तातील साखर मोजण्यात आली. कार्बोहायड्रेट्स युक्त भोजन घेतल्यानंतर रक्तात साखरेची पातळी वाढलेली आढळली. भूक लागलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा भूक न लागलेल्या विद्यार्थ्यांच्या रक्तात साखरेचे प्रमाण अधिक आढळले. रक्तात साखरेचे प्रमाण अचानक वाढल्यास आरोग्यावर परिणाम होतो. वैज्ञानिकांच्या मते भूक लागल्यानंतर भोजन करावे. यामुळे रक्तातील साखरही नियंत्रणात राहते आणि आरोग्यही उत्तम राहते.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक – दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाल नं. १, एन. के. इंडस्ट्रीया इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई – 400 063 येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघररोड, शनी मंदिराजवळ, भाईदर (पूर्व), ठाणे – 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क : – 9594418181 / 8424989898